संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६५ * ✻ अकोला ✻ | शनिवार, दिनांक २२ मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्राग्रलेख

## खरीखरी...

# दादांचा खरेपणा

आपले अजितदादा स्पष्ट वक्तेपणासाठी प्रसिद्ध आहेत. लाडक्या बहिणींचे दादा म्हणून विधान सभेच्या निवडणुकीच्या आधी त्यांनी आपल्या लाडक्या बहिणींना दरमहा पंधराशे रुपये दिले होते. या लाडक्या बहिणींना महायुतीचे सरकार आल्यावर दरमहा 2100 रुपये देऊ, असे आश्वासन तत्कालीन सरकारनेही दिलेले होते. निवडणुकीच्या तोंडावर इतरही बरीच आश्वासने देण्यात आली होती. त्याच्यामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीज बिलाची माफी यासारख्या बऱ्याच फुकट योजनांची खैरात आणि जाहिरात करण्यात आली होती. या फुकटेगिरी नंतर एक तर राज्याची आर्थिक शिस्त बिघडते. त्याबरोबरच फुकट पैसे मिळाल्यावर अनेक बहाद्दर कामच करत नाहीत. यामुळे आळशीपणा वाढतो आणि ऐन तारुण्यात 'दे हरी पलंगावरी' अशी फुकटेगिरीची भावना आपोआपच जागृत होते. हे सर्व गेल्या पंधरा-वीस वर्षात चांगलेच फोफावलेले आहे. या सर्व योजना चालू ठेवणे. म्हणजे राज्यावर न फिटणा?या कजार्चा बोजा वाढवण्यासारखे आहे. गरिबांना मदत केलीच पाहिजे. पण ती मदत करताना कोणतेही काम करायचेच नाही. असे वातावरण तयार केल्यावर समाजात काम करण्याची लालसा जरा तरी शिल्लक उरेल काय, असा आमचा साधा सवाल आहे. अजितदादा यांनी काल विधानसभेत त्यांच्या स्वभावाप्रमाणे स्पष्टपणे सांगून टाकले आहे की, सध्या आपली म्हणजे राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. जे सरकार काही वर्षांपूर्वी देशातील सर्वात श्रीमंत होते. ज्या सरकारवर कवडीचे कर्ज नव्हते. जे राज्य देशाला आदर्श राज्य म्हणून माहीत होते. असे आपले एकमेव महाराष्ट्र राज्य होते. पण आता आपल्या बोडक्यावर जवळजवळ हजार लक्ष कोटी रुपयांचे कर्ज आहे. जे आपल्याच राज्यातील जनतेच्या बोकांडीवर बसलेले आहे. या कजार्चे हप्ते आणि त्याचे व्याज भरता भरता आता सरकारचा गळा पकडणे तेवढेच बाकी उरलेले आहे. अजितदादा आता म्हणतात, सगळी सोंगे करता येतात. पण पैशाचे सोंग करता येत नाही. हा साक्षात्कार विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी झाला असता. तर आपला म्हणजेच आपल्या राज्याचा मोठा फायदा झाला असता. आताही उपमुख्यमंत्र्यांनी 2100 देणार नाही असे म्हटलेले नाही. पण 2100 रुपये केव्हा देऊ, याबाबतीत अजितदादा हतबल झालेले दिसतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मोठी पावले उचलण्याचे ठरवलेले दिसत आहे. अजित दादांकडे अर्थ आहे. तर मुख्यमंत्र्यांना परमार्थ साधायचा आहे. पण सध्या महाराष्ट्राच्या तिजोरीत पैशाची वाणवा आहे. हजारो कोटी रुपयांच्या योजना निवडणुकीपूर्वी धबधब्यासारख्या धोधो बरसू लागल्या. त्यामुळे महाराष्ट्राची जनता त्यामध्ये अक्षरशा न्हाऊन निघालेली आहे. आता लोक प्रश्न विचारत आहेत. तो असा की, एक साधा प्रश्न माझा लाख येती उत्तरे, हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे अशा मनस्थितीत महाराष्ट्राच्या जनतेला विचारात घेऊन अजित पवार यांनी जो स्पष्टवक्तेपणा दाखवलेला आहे. त्याबद्दल अजितदादांचे अभिनंदन केलेच पाहिजे. म्हणजेच अंथरूण पाहून आपले पाय लांब करायचे असतात, असे आता दादांचे म्हणणे आहे. आपल्या अनेक नेत्यांनी वेगवेगळ्या योजनांच्या घोषणा करून निवडणुकीच्या रिंगणात स्वतःला पवित्र करून घेतले. पण ही पवित्रता सिद्ध करण्यासाठी जे तेव्हा प्रसिद्ध केले आणि ते मागण्यासाठी जनता कटिबद्ध झाली. तर त्यात जनतेचा काही दोष आहे. असे कोणी म्हणेल काय, अर्थात असे आम्हीही म्हणत नाही. तुम्ही द्यायला तयार आहात ना, मग आम्ही घ्यायला तयार आहोत. पण आता हा निर्णय घेण्याचा व्यवहार पुढील काही काळासाठी थांबविणे गरजेचे आहे, असे अजित दादा यांचे म्हणणे आहे. आपला महाराष्ट्राचा नावलौकिक पुन्हा मिळवायचा असेल. तर जनतेच्या रागा-लोभाचा विशेष विचार न करता दूरदृष्टीने काही निर्णय अत्यंत कठोरपणाने घ्यावे लागतील. अजितदादा है तो सब चंगा ही होगा, असे अनेक मराठी लोक चक्क हिंदीमध्ये बोलतात आपल्या महाराष्ट्राचे पोटकल्याण आणि नवकोट कल्याण एकाच वेळी होऊ शकणार नाही. हे आमच्या पुढाऱ्यांनीही ध्यानात ठेवले पाहिजे. आता आपण काही काळासाठी अजितदादांची शिस्त अंगी बाळगली पाहिजे. जे मिळते आहे, त्यात समाधान मानून महाराष्ट्राचा कर्जबाजारीपणा वाढवणे. कधीही अस्सल मराठी माणसाला शोभणार नाही. त्यामुळेच अजित दादांचे खडे आणि खरे बोल प्रत्येकासाठी आदर्शवत आहेत. असे आपण समजून घेतले पाहिजे. आकाशी भरारी घेण्यापेक्षा जमिनीवर चालणे कठीण आहे, असे न समजता आपले पाय आपण जमिनीवरच ठेवावे. हाच आपल्या अर्थमंत्र्यांचा म्हणजेच अजितदादांचा संदेश आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वक्फ बोर्डाने बळकावलेल्या जमिनी काढून घेणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत माहिती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
राज्यात अनेक ठिकाणी वक्फ बोर्डाने जमिनी बळकावण्याच्या तक्रारी केल्या जात आहेत. याबाबत केंद्रीय स्तरावर कायदा करण्याचे काम सुरु आहे. मात्र, खासगी आणि देवस्थानच्या जमिनी वक्फ बोर्डाने बळकावल्या असल्याचे आढळून आले तर त्या काढून घेतल्या जातील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.



देवस्थान जमिनी वर्ग १ करणे, शासकीय जमिनींवरील अतिक्रमण आणि वन हक्क जमिनी याबाबत आमदार गोपीचंद पडळकर, आमदार मोनिका राजळे आणि आमदार देवराव भोंगळे यांनी विधानसभेत दाखल केलेल्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्य सरकारने या मुद्द्यावर गांभीर्याने विचार केला असून, महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशींनंतर सरकार विधिमंडळात कायदा आणणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मराठवाड्यात काही प्रमाणात शेतकऱ्यांना जमीन परत मिळण्याच्या निर्णयावर मंत्रिमंडळाने चर्चा केली असली, तरी प्रत्यक्ष कायदा मंजूर करावा लागेल असेही बावनकुळे म्हणाले.

**अतिक्रमण रोखण्यासाठी कडक कायदा**

शेतकऱ्यांच्या जमिनींबरोबरच देवस्थानच्या इनाम जमिनींवरील अतिक्रमणांचाही मुद्दा अधिवेशनात चर्चेत आला. आमदार मोनिका राजळे यांनी महाराष्ट्रातील विविध भागांतील देवस्थानांच्या जागांवर होत असलेल्या अतिक्रमणावर आवाज उठवला. त्यांनी नागपूर, राहुरी, श्रीरामपूर, कोल्हार यांसह अनेक ठिकाणी मंदिरांच्या जागांवर अनधिकृतरीत्या बांधकामे झाल्याचे दाखवून दिले. यावर बावनकुळे म्हणाले, अतिक्रमण हटवण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला निर्देश देऊन अतिक्रमण रोखण्यासाठी कडक कायदा आणला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

**वन हक्क प्रश्न निकाली काढणार**

जिवती तालुक्यातील वनहक्क आणि पट्ट्यांच्या मुद्यांवरही विधानसभेत चर्चा करण्यात आली. आमदार देवराव भोंगळे यांनी लक्षवेधी मांडली. त्यामध्ये जिवती तालुक्यातील ३३,४८० हेक्टर जमिनी वादग्रस्त ठरल्यामुळे अनेक शेतकरी जमिनीच्या मालकी हक्कांपासून वंचित आहेत, असे सांगण्यात आले. त्यावर वन विभाग, केंद्र सरकार, महसूल, स्थानिक जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

# औरंगजेबाची कबर हे महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतीक !

## इतिहासकार सदानंद मोरे यांचे मत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
औरंगजेबाची कबर हे महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतीक आहे. त्याची कबर पाहून आपली छाती फुगली पाहिजे. कारण त्याला 25 ते 27 वर्षे महाराष्ट्र जिंकता आला नाही आणि इथेच मरावे लागले, असे मत इतिहासकार सदानंद मोरे यांनी व्यक्त केले आहे, पण औरंगजेबाची कबर पाडावी, असे माझे मत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



सदानंद मोरे म्हणाले की, औरंगजेब हा विषय महाराष्ट्रात येण्यामागे छावा हा सिनेमा आहे. जे काही अत्याचार औरंगजेब याने केल्याचे दाखवले आहे, त्यामुळे लोकांच्या मनात क्षोभ निर्माण झाला. ज्या व्यक्तीने कुटुंबीयांना सोडले नाही, मरणानंतर त्यांचे दफन विधी होऊ दिले नाही. तो छत्रपती संभाजी राजे यांच्यासोबत कसा वागणार? असे त्यांनी मुलाखतीत म्हटले आहे.

सदानंद मोरे म्हणाले की, औरंगजेब वडिलांना अटक करू शकतो. स्वतःच्या भावाचा शिरच्छेद करू शकतो. त्याचे समर्थन कुणीही माणूस करू शकत नाही. यात कुठेही धमार्चा मुद्दा येत नाही. शिरच्छेदानंतर औरंगजेबाने भावाचे योग्य धार्मिक विधी होऊन दफनही होऊ दिले नाही. त्याला गाडले.




## दहशतवाद, नक्षलवाद व अतिरेकी हे एक रोग...

**अमित शहा**



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आठव्या दिवशी शुक्रवारी, अमित शहा यांनी गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेला उत्तर दिले. ईशान्येकडील दहशतवाद, नक्षलवाद आणि बंडखोरी हे मागील सरकारने वारसा म्हणून आम्हाला दिले. हे रोग बनले होते. गृहमंत्र्यांनी सांगितले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये विरोधी पक्षाच्या ३३ वर्षांच्या राजवटीत तिथे सिनेमागृहेही उघडली गेली नाहीत.

# उद्धव ठाकरेंनी संबंध तोडले

## फडणवीसांनी मांडली बेबाक भूमिका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
उद्धव ठाकरे यांच्याशी आता पुन्हा युती होऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर उद्धव ठाकरे यांनी काहीही संबंध ठेवले नाही, त्यांनी संबंध तोडून टाकले आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासोबत संबंध नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

लाडके ठाकरे कोण? उद्धव ठाकरे की राज ठाकरे? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट उत्तर देणे टाळले आहे. ठाकरे असे आहेत की, त्यांना आपण लाडके म्हणायचे आणि त्यांनी आपल्याला दोडके म्हणायचे. त्यामुळे यामध्ये आपण कशासाठी पडायचे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. गेल्या पाच वर्षांमध्ये माझा उद्धव ठाकरेंसोबत काही संबंध राहिलेला नाही. राज ठाकरेंसोबत संबंध राहिले आहेत, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.







# फडणवीस- पटोले यांच्यात आव्हान-प्रतिआव्हान



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :**
गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या मुद्द्यावरून शुक्रवारी विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि काँग्रेसच्या नाना पटोले यांच्यात आव्हान-प्रतिआव्हानाचा सामना रंगला.

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या अंतर्गत ज्या बेरोजगारांना तरुणांना राज्य सरकारच्या विविध विभागात घेण्यात आले आहे, त्यांना सेवेत कायम करण्याचे आश्वासन निवडणुकीत महायुती सरकारच्या वतीने देण्यात आले होते, असा दावा नाना पटोले यांनी केला. हा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी फेटाळून लावला.

विधानसभेत विनियोजन विधेयक मंजूर करण्यात आले. तत्पूर्वी या विधेयकावर झालेल्या चर्चेच्या निमित्ताने नाना पटोले यांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेचा मुद्दा मांडला.



# दिशा सालियन प्रकरणावर पहिल्यांदाच बोलले देवेंद्र फडणवीस

## सरकारची भूमिका मांडताना म्हणाले

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात दिशा सालियन मृत्यू प्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी न्यायालयात याचिका दाखल केली असून दिशाची हत्या झाल्याचा दावा केला आहे. शिवाय त्यांनी आदित्य ठाकरेंचाही उल्लेख केल्यामुळे त्यावरून राजकीय वर्तुळात सत्ताधारी व विरोधकांमध्ये विधिमंडळाच्या आत आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी खडाजंगी पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पहिल्यांदाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावर सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

दिशा सालियनच्या वडिलांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये गंभीर आरोप केले आहेत. व्या मजल्यावरून पडूनही दिशाच्या शरीरावर एकही जखम कशी झाली नाही? हा प्रश्न त्यांनी



उपस्थित केला. या आधारावर दिशानं आत्महत्या केली नसून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यांच्या वकिलांनी यात थेट आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे व सूरज पांचोली यांची आरोपी म्हणून नावं घेत खळबळ उडवून दिली आहे.

### आदित्य ठाकरेंनी मांडली भूमिका

सतीश सालियन यांच्या पत्रकार परिषदेपासून आदित्य ठाकरेंना सत्ताधाऱ्यांकडून लक्ष्य केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंनी गुरुवारी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांची भूमिका मांडली. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयात त्यांच्या आरोपांवर जे काही उत्तर द्यायचं ते आम्ही देऊ. पण इतर मुद्द्यांवरून लक्ष भरकटवण्यासाठी हा मुद्दा उपस्थित केला जात आहे. या मुद्द्यावर त्यांना सभागृह बंद पाडायचं असेल तर खुशाल पाडावं. पण मी मुद्द्यावर बोलत राहणार, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

दरम्यान, या मुद्द्यावरून अनिल परब विरुद्ध चित्रा वाघ अशी थेट खडाजंगीही सभागृहात पाहायला मिळाली. पाच वर्षांनंतर का याचिका दाखल केली गेली, असा सवाल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नेत्यांकडून उपस्थित केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंविरोधात या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात असताना त्यांच्याविरोधात कारवाई करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे का? यासंदर्भात चर्चेला उधाण आलं आहे. त्याबाबत विचारणा केली असता देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

### दिशा सालियन प्रकरणावर देवेंद्र फडणवीसांनी भूमिका काय?

देवेंद्र फडणवीसांनी एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीमध्ये यावर भाष्ट केलं आहे. ही सगळी चर्चा कोर्टाच्या केसमुळे सुरू झाली. उच्च न्यायालयात एका वकिलानं याचिका दाखल केली आहे. दिशा सालियनच्या वडिलांनीही एक मुलाखत दिली आहे.

शासनाची भूमिका यासंदर्भात पक्की आहे. न्यायालय काय म्हणतंय? न्यायालयात ते काय पुरावे देत आहेत? यावर पुढची भूमिका ठरेल, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

आत्तातरी शासनाच्या किंवा पोलिसांच्या पातळीवर हा विषय नाही. न्यायालय ज्या प्रकारे आम्हाला आदेश देईल किंवा न्यायालयात जर काही नवीन पुरावे, गोष्टी आल्या तर त्या आधारावर त्या वेळी सरकार निर्णय घेईल. आत्तातरी आम्ही न्यायालयाकडे नजर ठेवून आहोत, असं ते म्हणाले.

# ५६ नाही, त्यापेक्षा जास्त आकडा लोक सांगतात सुषमा अंधारेंचा चित्रा वाघ यांना टोला

## चित्रा वाघ यांचाही जोरदार पलटवार आम्ही काय रस्त्यावर पडलोय का?

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : दशा सालियन प्रकरणावरून विधानसभेत आणि विधानपरिषदेत गदारोळ झाल्यानंतर भाजप आमदार चित्रा वाघ यांनी उबाठा शिवसेनेवर जोरदार टीका केली. यावर प्रत्युत्तर देताना उबाठा शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी चित्रा वाघ यांच्यावर खरमरीत शब्दांत टोला लगावत सोशल मीडियावर पोस्ट केली आहे.

दिशा सालियन प्रकरणावर बोलताना चित्रा वाघ यांनी, उबाठा शिवसेनेचे आमदार अनिल परब यांच्यासारखे ५६ जण मी पायाला बांधून फिरते. मी कोणाच्या वशिल्याने आलेली नाही, असे विधान केले होते. त्यावर सुषमा अंधारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

आपल्या पोस्टमध्ये सुषमा अंधारे म्हणाल्या, सभागृहाची सुसंस्कृत परंपरा आणि गरिमा धाब्यावर बसवत, एक बाई अत्यंत विचित्र आवाजात किंचाळत म्हणाली की ती ५६ जण पायाला बांधून फिरते. ही भाषा कोणत्या शाळाकॉलेजात शिकवली जाते हे माहीत नाही. पण हे दरवेळी सांगण्याची गरज काय आहे? त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख सांगताना लोक यापेक्षा जास्त आकडा सांगतात.

याच संदर्भात सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, या आकड्याबाबत आमदार जितेंद्र आव्हाड आणि मेहबूब शेख यांच्यासारखे जाणकार अधिक विस्ताराने सांगू शकतील, असा टोलाही त्यांनी लगावला.

दरम्यान, सुषमा अंधारेंच्या या टीकेवर भाजप आमदार चित्रा वाघ यांनीही तात्काळ पलटवार केला. मी कोणाच्या बापाला घाबरत नाही. ज्या पद्धतीने माझ्यावर टीका केली जात आहे आणि माझ्या कॅरेक्टरवर कुणी बोलणार असेल, तर मी ते सोडणार नाही, असा इशारा वाघ यांनी दिला.आम्ही काय रस्त्यावर पडलोय का? असा सवाल करत त्यांनी नाव न घेता सुषमा अंधारे यांना प्रत्युत्तर दिले. दिशा सालियन प्रकरणावरून सुरू झालेल्या या आरोप-प्रत्यारोपामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, या वादाला आणखी कोण वळण लागते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# वा! चित्राताई वाघ व्वा...

## बाळासाहेब असते तर त्यांनी तुमचा गौरव केला असता नारायण राणेंकडून चित्रा वाघ यांचे कौतुक

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : दिशा सालियन प्रकरणावरून विधानसभेत आणि विधानपरिषदेत मोठा गदारोळ झाल्यानंतर भाजप खासदार नारायण राणे यांनी भाजप आमदार चित्रा वाघ यांचे जाहीर कौतुक केले आहे. वा! चित्राताई वाघ व्वा... बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी तुमचा गौरव केला असता, अशा शब्दांत नारायण राणे यांनी वाघ यांच्या भूमिकेचे समर्थन करत स्तुती केली.

दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावर विधानसभेत आणि विधान परिषदेत चर्चेवेळी चित्रा वाघ यांनी ठाम भूमिका घेतली होती.

दिशा सालियनच्या वडिलांनी या प्रकरणी याचिका दाखल केली असून, राज्य सरकारने यासाठी एसआयटी नेमली आहे. या प्रकरणाचा अहवाल सर्वांसमोर यायला हवा, दूध का दूध आणि पानी का पानी व्हायला हवं, अशी मागणी वाघ यांनी विधानपरिषदेत केली होती.

यावेळी उबाठा शिवसेनेचे आमदार अनिल परब आणि चित्रा वाघ यांच्यात जोरदार खडाजंगी झाली होती. त्यानंतर नारायण राणे यांनी ट्विटरवरून चित्रा वाघ यांची पाठराखण केली आणि त्यांचे खुले कौतुक केले.

राणे आपल्या ट्विटमध्ये म्हणाले, वा! चित्राताई वाघ वा! छत्रपती शिवरायांच्या १५ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात एका निरपराध मुलीवर अत्याचार करून तिचा खून करणाऱ्यांना आपण चव्हाट्यावर आणले. आपल्याला विरोध करणाऱ्यांचीही तुम्ही चिंधड्या उडवल्या. तुमच्यासारख्या लढवय्या वाघिणींची महाराष्ट्राला गरज आहे. आज आदरणीय बाळासाहेब ठाकरे असते, तर त्यांनी तुमचा गौरवच केला असता. लगे रहो चित्राताई!

राणेंच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

चित्रा वाघ यांनी आपली भूमिका ठामपणे मांडल्याबद्दल भाजपमध्येही त्यांचे जोरदार कौतुक होत आहे. दिशा सालियन प्रकरणाचा तपास आणि त्यावरून सुरु असलेली राजकीय खडाजंगी अजून किती तापते, हे पाहणे आता उत्सुकतेचे ठरणार आहे.

# दिशा सालियन प्रकरणावरून चित्रा वाघ रोहिणी खडसे यांच्यात जोरदार जुपंली

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरून भाजप आमदार चित्रा वाघ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्यात चांगलीच जुपंली झाली आहे. सोशल मीडियावरून दोघींमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून, यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. दिशा सालियन प्रकरणावरून काल विधानपरिषदेत भाजप आमदार चित्रा वाघ यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आमदार अनिल परब यांच्यासोबत त्यांची जोरदार खडाजंगी झाली. वाघ यांच्या या आक्रमक भाषणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. यावर राष्ट्रवादीच्या रोहिणी खडसे यांनी खोचक प्रतिक्रिया देत चित्रा वाघ यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी ट्वीट करत वाघ यांचा व्हिडीओ शेअर केला आणि म्हणाल्या, बाईईईईई काय हा प्रकार... थोडं थोडं साम्यच आहे, नाही! पण कोणीतरी सांगा की आपल्या राज्याचे ते सर्वोच्च सभागृह आहे... बिग बॉसचा एखादा सीझन नाही. चित्रा वाघ यांचे भाषण पाहून मला बिग बॉसचा सीझन आठवला. कार्यक्रमात जितकी एकमेकांची उनी-धुणीकाढाल, तेवढाच बिग बॉस खूश होतो. तसंच चित्रा वाघ यांनी हे वक्तव्य कोणाला तरी खूश करण्यासाठी केले का? असा सवालही खडसे यांनी उपस्थित केला. रोहिणी खडसे यांच्या या टीकेला चित्रा वाघ यांनीही तितक्याच ठाम शब्दांत प्रत्युत्तर दिलं. रोहिणी खडसे यांचे वडील विधान परिषदेत माझ्या समोर बसतात, त्यांनी त्यांना विचारावे, ते जास्त चांगलं सांगतील, असं म्हणत वाघ यांनी खडसेंवर पलटवार केला. या जुपंलीमुळे राज्याच्या राजकारणात चांगलाच रंगतदार वाद रंगला असून, सोशल मीडियावरही या दोघींच्या या वादाची जोरदार चर्चा सुरू आहे. दिशा सालियन प्रकरणाच्या निमित्ताने सुरु झालेला हा वाद आणखी किती वाढतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# हिंमत असेल तर उध्दव ठाकरेंना जाब विचारायला चला : चित्रा वाघ यांचे सभागृहात आव्हान

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : विधान परिषदेत गुरुवारी दिशा सालियन प्रकरणावरून तुफान रण पेटले. भाजपच्या आमदार चित्रा किशोर वाघ यांनी या प्रकरणात एसआयटी रिपोर्ट सार्वजनिक करून पुन्हा सखोल तपासाची मागणी केली असता, विरोधी पक्षाच्या उबाठा गटाने त्यांना पूजा चव्हाण प्रकरणावरून घेरण्याचा प्रयत्न केला. यावर चित्राताईंनी सभागृह दणाणून सोडत उबाठा गटाचे आमदार अनिल परब यांना चोख प्रत्युत्तर दिले आणि थेट उध्दव ठाकरे यांना जाब विचारण्याचे आव्हान दिले. हिंमत असेल तर चला, आपण उध्दव ठाकरे जींना जाब विचारायला जाऊ, असे त्यांनी ठणकावले.

### दिशा सालियन प्रकरणावर चर्चा

शिवसेना (शिंदे गट)च्या आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिशा सालियन प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणी उपस्थित केली. याला पाठिंबा देत चित्रा वाघ यांनी म्हटले, एसआयटीचा रिपोर्ट सार्वजनिक करावा आणि गुन्हेगार कितीही मोठा असला तरी त्याला कठोरात कठोर शिक्षा द्यावी. दिशाच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करताच या प्रकरणाचे पडसाद सभागृहात उमटले. मात्र, यावर उबाठा गटाचे अनिल परब यांनी चित्राताईंवर वैयक्तिक टीका करत पूजा चव्हाण प्रकरणाचा उल्लेख केला आणि मनीषा



कायंदे यांच्यावरही खालच्या शब्दांत आरोप केले. चित्रा वाघ यांनी अनिल परब यांना रणरागिणीच्या शैलीत प्रत्युत्तर दिले. जेव्हा एखाद्या महिलेला तर्काने उत्तर देता येत नाही, तेव्हा पुरुष तिच्या वैयक्तिक गोष्टींवर टीका करून तिचे पाय खेचतात. हीच प्रचिती आज सभागृहात आली, असे म्हणत त्यांनी परब यांच्यावर हल्ला चढवला. त्यांनी पुढे सांगितले, संजय राठोड यांना क्लीनचिट देणारे तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे होते. मी पूजा चव्हाणला न्याय मिळावा म्हणून जीवाच्या आकांताने लढले. पण उध्दव ठाकरेंनी संजय राठोडला वाचवले नसते, तर ही वेळ आलीच नसती. हिंमत असेल तर चला, उध्दव ठाकरेंना जाब विचारायला जाऊ.

चित्राताईंनी विरोधकांच्या महिलाविरोधी भूमिकेकडेही लक्ष वेधले. एक वडील आपल्या मुलीसाठी न्याय मागत असताना विरोधक राजकीय बचावासाठी सभागृहातील महिलांचा अपमान करतात. आजच सुनिता विल्यम्स यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला असताना विरोधकांनी महिलाविरोधी भूमिका घेतली, असे त्यांनी निदर्शनास आणले. त्यांनी विरोधकांचे वर्तन हे समाजातील महिलांबद्दलच्या त्यांच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब असल्याचा आरोप केला.

दिशा सालियन प्रकरणावरून सुरू झालेली चर्चा पूजा चव्हाण प्रकरणापर्यंत गेली आणि सभागृहात तणाव वाढला. चित्रा वाघ यांनी विरोधकांवर महिलांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. संवेदनशील मुद्द्यांचे गांभीर्य न जाणता विरोधक गोंधळ घालत आहेत. सभागृहात महिलांना अशी वागणूक मिळत असेल, तर समाजात त्यांचा किती आदर असेल? असे सवाल त्यांनी उपस्थित केले.

आमदार चित्रा वाघ यांनी दिशा सालियन प्रकरणात तपासाची मागणी करताना उध्दव ठाकरेंना थेट आव्हान दिले आहे. सभागृहातील या घडामोडींमुळे उबाठा गट आणि सत्ताधारी यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे.

चित्राताईंच्या रणरागिणीच्या पवित्र्याने विरोधकांची बोलती बंद झाली असून, या प्रकरणाचे पडसाद अधिवेशनाबाहेरही उमटण्याची शक्यता आहे. आता दिशा प्रकरणातील तपास आणि कोर्टाचा निर्णय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर मकोका

मुंबई , दि. २१ : कायद्यानुसार गो हत्या करणे गुन्हा आहे. मात्र गो हत्येचा वारंवार गुन्हा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वारंवार अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांवर यापुढे संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी आज विधानसभेत श्रीगोंदा येथील कायदा सुव्यवस्थेबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.गोतस्करीचे प्रमाण वाढत चालल्याने हे प्रकार रोखण्यासाठी वेगळा कायदा करण्यात यावा, अशी मागणी जगताप यांनी केली. या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर मकोकाची कारवाई करण्याचा इशारा दिला.

तत्पूर्वी, या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे २नोव्हेंबर २०२४ रोजी दोन समाजामध्ये वाद झाला. या वादाचे नंतर मारहाणीत रूपांतर झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तसेच मारहाणीत जखमींना पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. दुर्दैवाने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केलेल्या एका इसमाचा यात मृत्यू झाला. पोलिसांनी यामध्ये कुठल्याही प्रकारची दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही.

# पुणे शहरातील रस्त्यांच्या कामांचे 'थर्ड पार्टी ऑडिट' मंत्री उदय सामंत यांची माहिती

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांमध्ये दर्जा तपासण्यासाठी प्रत्येक कामाचे 'थर्ड पार्टी ऑडिट' केले जाणार आहे. या ऑडिटनंतरच संबंधित कामांचे देयक दिले जाणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. वारजे माळवाडी परिसरातील रस्त्यांच्या कामांबाबत आमदार भीमराव तापकीर यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत आमदार बापू पठारे यांनीही सहभाग घेतला. मंत्री सामंत म्हणाले की, पुणे महापालिकेच्या पथ विभागाच्या कामांचे थर्ड पार्टी ऑडिट 'मेसर्स ईआयएल' या कंपनीमार्फत केले जात आहे. पथ विभागाच्या पहिल्या टप्प्यात ८ कोटी ३० लाख रुपयांच्या कामांपैकी ४ कामे पूर्ण झाली असून, ३कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. दुसऱ्या टप्प्यात ३ कोटी ७० लाख रुपयांची कामे करण्यात येणार असून, त्यातील काहींना कार्यादेश देण्यात आले आहेत, तर काही निविदा प्रक्रियेत आहेत. डांबरीकरण केलेल्या रस्त्यांची तीन वर्षे आणि सिमेंट काँक्रीट रस्त्यांची पाच वर्षे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची असते.

या कालावधीत निकृष्ट काम आढळल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदारांकडून करवून घेण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. राज्यात रस्त्यांच्या दर्जाबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने शासनाने थर्ड पार्टी ऑडिट अनिवार्य केल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे पुणे शहरातील रस्ते कामांची गुणवत्ता सुधारण्यास आणि नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्राच्या विधिमंडळात खोडके दाम्पत्याचा नवा रेकॉर्ड

मुंबई , दि. २१ : महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात प्रथमच एक पती-पत्नी जोडपे विधिमंडळात एकत्रितपणे आमदार म्हणून काम करणार आहे. संजय खोडके आणि सुलभा खोडके या दाम्पत्याने हा अनोखा विक्रम नोंदवला आहे. संजय खोडके हे विधान परिषदेचे सदस्य असून, सुलभा खोडके या विधानसभेच्या आमदार आहेत. आगामी साडेचार वर्षे हे जोडपे राज्याच्या विधिमंडळात एकत्रितपणे जनतेची सेवा करणार आहे. ही घटना राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

### विधिमंडळातील पती-पत्नींचइतिहास

यापूर्वी महाराष्ट्राच्या विधिमंडळात पती-पत्नी जोडपे आमदार म्हणू निवडून आले असले, तरी ते कधीही एकाच वेळी सभागृहात उपस्थित राहिले नाहीत. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आणि त्यांच्या पत्नी शालिनी पाटील हे दोघेही आमदार राहिले, पण वेगवेगळ्या काळात. त्याचप्रमाणे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि त्यांच्या पत्नी अमिता चव्हाण, तसेच कन्नड मतदारसंघाचे माजी आमदार रायभान जाधव आणि त्यांच्या पत्नी तेजस्विनी जाधव, हर्षवर्धन जाधव आणि संजना जाधव यांनीही वेगवेगळ्या कार्यकाळात विधिमंडळात प्रतिनिधित्व केले. दौड मतदारसंघातून सुभाष कुल यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी रंजना कुल, तर माजी मंत्री आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर सुमन पाटील आमदार झाल्या. पाथर्डी-शेवगावमधूनाजीव राजळे आणि मोनिका राजळे यांनीही वेगवेगळ्या टर्ममध्ये काम पाहिले.संजय आणि सुलभा खोडके यांनी आपापल्या मतदारसंघात मजबूत पकड निर्माण केली आहे. सुलभा खोडके या अमरावती मतदारसंघातून विधानसभेत निवडून आल्या, तर संजय खोडके हे विधान परिषदेत सक्रिय आहेत. या जोडप्याच्या एकत्रित उपस्थितीमुळे पक्षाला आणि जनतेला नवीन दृष्टिकोन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, खोडके दाम्पत्याचे हे यश त्यांच्या समर्पण आणि जनसंपर्काचे फलित आहे. खोडके दाम्पत्याच्या या नव्या अध्यायामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा आयाम निर्माण होणार आहे. पुढील साडेचार वर्षे हे जोडपे विधिमंडळात एकत्रितपणे काय योगदान देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुंबई-महाराष्ट्रातीलरुग्णालयांत जनेरिक औषधे उपलब्ध करणार का? प्रविण दरेकरांचा सवाल

मुंबई , दि. २१ : राज्यातील आणि मुंबईतील रुग्णालयांमध्ये जनेरिक औषधे उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन ठोस निर्णय घेणार का, असा सवाल भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज (२० मार्च) विधान परिषदेत उपस्थित केला. विधान परिषदेच्या प्रश्नोत्तर तासादरम्यान जनेरिक औषधांच्या उपलब्धतेवर चर्चा झाली, ज्यामध्ये दरेकर यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचा हवाला देत राज्य सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विधान परिषदेच्या सदस्या उमा खापरे यांनी जनेरिक औषधांच्या उपलब्धतेबाबत प्रश्न मांडला होता. या चर्चेत सहभागी होताना प्रविण दरेकर म्हणाले, केंद्र सरकारने रुग्णालयांमध्ये मेडिकल स्टोअर असावेत आणि त्यात जनेरिक औषधे उपलब्ध करावीत, असा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला मान्यताही मिळाली आहे. पण राज्यात आजही जनेरिक औषधांना दुर्लक्षित केले जाते. त्यांच्यासाठी कोणतीही सक्ती नाही. महाराष्ट्र आणि मुंबईतील रुग्णालयांना याबाबत ठोस निर्णय घेणार का? त्यांनी जनेरिक औषधांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.दरेकर यांनी सांगितले की, केंद्र सरकारने जनेरिक औषधे ठेवणे रुग्णालयांसाठी बंधनकारक करण्याचा आग्रह धरला आहे. जनेरिक औषधे स्वस्त आणि परिणामकारक असतात, पण राज्यात त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. रुग्णालयांमध्ये मेडिकल स्टोअर उभारून तिथे जनेरिक औषधे उपलब्ध करणे गरजेचे आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

## २५ हजार कोटींच्या वसुलीसाठी अभय योजना

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : केंद्र आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे राज्य सरकारची जवळपास २५ हजार कोटी रुपयांची कर थकबाकी आहे. या थकबाकीच्या वसुलीसाठी सरकारने विशेष सवलती देण्याचा निर्णय घेतला असून त्याअंतर्गत अर्थसंकल्पात घोषणा केल्यानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी अभय योजना जाहीर केली. यासंदर्भातील विधेयक आज विधानसभेत सादर करण्यात आले. 'महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२५' असे या विधेयकाचे नाव आहे. या विधेयकामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांकडे असलेल्या थकबाकीच्या तडजोडीला गती मिळेल. त्यातून थकीत महसूल राज्य सरकारच्या तिजोरीत जमा होऊन विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. या विधेयकात केंद्र आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांना दिलासा देणाऱ्या तरतुदी आहेत. वस्तू आणि सेवा कर लागू होण्यापूर्वी राज्य कर विभागातर्फे आकारण्यात येणारे विविध कर यासंदर्भात ही योजना असणार आहे. विधेयक लागू झाल्याच्या दिनांकापासून ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत योजना कार्यरत असेल. १ एप्रिल २००५ ते ३० जून २-१७ा कालावधीतील थकबाकी यासाठी पात्र असणार आहे. अविवादीत करासाठी कोणतीही सवलत दिली जाणार नाही, त्याचा १०० टक्के भरणा करणे अनिवार्य असणार आहे. ही संपूर्ण योजना ऑनलाईन पद्धतीने पारदर्शकपणे राबवली जाणार असल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.

## पोलिस आयुक्तालयासाठी १५ एकर जागेच्या भूसंपादनास शासनाची मान्यता

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : पिंपरी-चिंचवडपोलिस आयुक्तालयाच्या मजबुतीसाठी वाकड येथे १५ एकर जागेच्या भूसंपादनास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष पुढाकारामुळे हा निर्णय तातडीने घेण्यात आला असून याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवडशहरातील वाढते औद्योगिकीकरण, स्थलांतरीत लोकसंख्येमुळे वाढलेला ताण आणि वाढती गुन्हेगारी यामुळे पोलिस यंत्रणेच्या सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली होती. त्यामुळे पोलिस उप-आयुक्त परिमंडळ सह, इतर अनुषंगिक कार्यालये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी वाकड येथे १५ एकर जागा भूसंपादन करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार, वाकड येथील सर्व्हे नंबर २०८ आणि २०४ मधील ही जागा वाणिज्यिक दराने अधिमूल्य रकमेचा भरणा करून भूसंपादित करण्यात येणार आहे. या जागेवर पोलिस विभागासाठी आवश्यक असलेल्या इमारती, कार्यालये आणि निवास व्यवस्था उभारली जाणार आहे. या निर्णयामुळे पोलिस दलाला आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असून कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. कायदा-सुव्यवस्थाअधिक सक्षम होईल आणि गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलिसांना बळ मिळेल. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी सुसज्ज निवास सुविधा उभारण्यात येणार असल्याने त्यांच्यावरचा ताण कमी होईल.

# मुंबईत देशातील पहिली ई-वॉटरटॅक्सी लवकरच धावणार:मंत्री नितेश राणे

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. २१ : मुंबईकरांची ई-वॉटर टॅक्सीबाबतची उत्सुकता लवकरच संपणार असून, देशातील पहिली पर्यावरणपूरक ई-वॉटरटॅक्सी मुंबईच्या जलमार्गावर धावणार आहे. स्वीडनची कँडेला कंपनी या सेवेचा पायलट प्रोजेक्ट राबवणार असून, ही सेवा तातडीने सुरू करण्याच्या सूचना मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी स्वीडनचे महावाणिज्य दूत स्वेन ओस्टबर्ग यांना दिल्या आहेत. मंत्रालयात आज झालेल्या बैठकीत या संदर्भात सविस्तर चर्चा झाली.

### बैठकीतील चर्चा आणि निर्णय

मंत्री नितेश राणे यांनी स्वीडनचे महावाणिज्य दूत स्वेन ओस्टबर्ग यांच्यासोबत मंत्रालयात बैठक घेतली. यावेळी ओस्टबर्ग यांच्या सल्लागार सलोनी झव्हेरी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत ई-वॉटर टॅक्सी प्रकल्पाला गती देण्यावर भर देण्यात आला. मंत्री राणे यांनी सांगितले की, मुंबई महानगरातील वाहतूक कोंडी ही मोठी समस्या बनली असून, या समस्येवर मात करण्यासाठी ई-वॉटर टॅक्सी हा प्रभावी पर्याय ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या



प्रकल्पाला लवकर सुरुवात व्हावी, यासाठी आग्रह धरला आहे.

### पायलट प्रोजेक्टचे स्वरूप

ई-वॉटर टॅक्सीचा पायलट प्रोजेक्ट गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा आणि गेटवे ऑफ इंडिया ते अलिबाग या जलमार्गांवर राबवला जाणार आहे. या सेवेमुळे मुंबईला भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, असा विश्वास राणे यांनी व्यक्त केला. स्वीडनच्या कँडेला कंपनीला नागरिकांची सुरक्षितता, पर्यावरण संरक्षण आणि वातावरणाचा विचार करून हा प्रकल्प राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, वॉटर टॅक्सीचे दर सर्वसामान्यांना परवडतील असे माफक ठेवावेत आणि कंपनीला लागणाऱ्या परवान्यांसाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही राणे यांनी स्पष्ट केले.

### स्वीडनच्या कंपनीचे योगदान

महावाणिज्य दूत स्वेन ओस्टबर्ग यांनी महाराष्ट्रातील बंदरांच्या विकासात स्वारस्य दाखवले. ते म्हणाले, स्वीडनची कँडेला कंपनी लवकरच मुंबईत येऊन या प्रकल्पाबाबत सर्व माहितीचे सादरीकरण करेल.

त्यानंतर पायलट प्रोजेक्ट त्वरित सुरू करण्यात येईल. त्यांनी पोर्टच्या विकासाबाबतही स्वीडनच्या कंपन्या योगदान देण्यास उत्सुक असल्याचे नमूद केले आणि यासंदर्भात चर्चा पुढे नेण्याचे आश्वासन दिले.

### ससून डॉकला मॉडेल पोर्ट बनवण्याचा प्रस्ताव

मंत्री राणे यांनी ससून डॉकला देशातील एक नंबरचे मॉडेल पोर्ट बनवण्याचा प्रस्ताव मांडला. स्वीडनच्या कंपन्यांनी राज्य शासनाला पोर्ट विकासाबाबत ठोस प्रस्ताव सादर करावा. वाहतुकीसाठी सुलभ ठिकाणांची पाहणी करून एक आदर्श पोर्ट विकसित करावे, असे त्यांनी सांगितले. यासाठी मेरीटाइम बोर्डाशी चर्चा करून एप्रिल महिन्यात पाहणी पूर्ण करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ओस्टबर्ग यांनी पोर्टच्या स्वच्छतेसह सोयी-सुविधा आणि गुंतवणुकीबाबत माहिती दिली.

### मुंबईसाठी नवे पर्व

ई-वॉटर टॅक्सीच्या या प्रकल्पामुळे मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडणार असून, पर्यावरणपूरक आणि जलद पर्याय उपलब्ध होणार आहे. हा प्रकल्प यशस्वी झाल्यास देशातील इतर शहरांसाठीही तो प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुढील काही महिन्यांत या प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डाबकी रोडचे विस्तारीकरण थंडावले



अकोला : डाबकी रोड विस्तारीकरण होणार असे म्हणत डाबकी रोड चे खंडर केले गेले. पण, विस्तारीकणाचे काम मात्र सुरु झाले नाही. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शहरातील वर्दळीचा असलेल्या डाबकी रोडचे विस्तारीकरण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पावले उचलली होती. डाबकी रोड पोलिस स्टेशन ते कॅनॉल रोडपर्यंत दोन भागात हा रस्ता तयार करण्यात येणार होता. पण, विस्तारीकरणाचे घोडे कुठे अडले असा प्रश्न पडला आहे. डाबकी रोड रेल्वेच्या उड्डाणपुलावर स्ट्रिट लाईट्स नसल्याने या ठिकाणी अपघात वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या उड्डाणपुलावर स्ट्रिट लाईट्स लावण्यासाठी महापालिका की बांधकाम विभाग कोण पुढाकार घेणार असा प्रश्न असुन आमदार साजीद खान पठाण यांचे याकडे लक्ष आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होतो. डाबकी रोड ते पुढे निमकर्दा, गायगाव कडे जाणारे रेल्वे गेट आता बंदच असते अशी ओरड नागरिकांची आहे. त्यामुळे आता थेट दूचाकी देखील उड्डाणपुलावरुन न्यावी लागत आहे.

# शिवापूर अटल आनंद घनवनात आगीचा तांडव: १० हेक्टर क्षेत्र खाक!



**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** अकोला वनपरिक्षेत्रातील शिवापूर अटल आनंद घनवन येथे २० मार्च रोजी भीषण आगीने अंदाजे १० हेक्टर क्षेत्र भस्मसात केले. अकोला–वाशिम रेल्वे मार्गावर प्रवास करताना एका प्रवाशाने फेकलेल्या बीडी किंवा काडीमुळे आग लागल्याची शक्यता आहे. वाऱ्याच्या वेगाने आगीने रौद्र रूप धारण केले.

मा. उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी आणि मा. सहायक वनसंरक्षक (भ.व) सचिन खुणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) विश्वास राम थोरात व त्यांच्या अधिनस्थ वनपाल आणि वनकर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्नांनी आगीवर नियंत्रण मिळवले.

आगीमुळे खाजगी कुरण आणि शेती क्षेत्र देखील आगीच्या विळख्यात सापडले, परिणामी शेतकऱ्यांचे पाळीव प्राण्यांचे खाद्य जळून खाक झाले. वनविभाग आणि अग्निशमन दलाने ब्लोअर मशीनच्या सहाय्याने संध्याकाळपर्यंत आग आटोक्यात आणली. प्रत्यक्ष मोजमापानंतर नुकसानाचा आकडा समोर येणार आहे.



## अकोट फाइल मध्ये सिलिंडर स्फोट



अकोला : अकोट फाइल भागात भारत नगर स्थित टीनाचे कच्चे घर सिलिंडरचा स्फोट झाल्याने आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. यामुळे आजूबाजूला खळबळ उडाली. आगीने उग्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळा दुरून दिसत होत्या. दोन घरातील साहित्य जळाले.घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन विभागाच्या दोन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. परिसरात प्रवेश करायला वाहन चालकाला कसरत करावी लागली. कर्मचा-यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. काही वेळाने त्यांना यश मिळाले. परंतु दोन्ही कच्च्या घरातील सामान जळून खाक झाले. बरेच नुकसान झाले. परिसरातील नागरिक घटनास्थळी गोळा झाले होते. तसेच अकोट फाइल पोलिस देखील घटनास्थळी दाखल झाले होते.

# कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वन दिवस उत्साहात साजरा



**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** आज २१ मार्च रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अकोला वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. कुमार स्वामी (आयएफएस) यांची प्रमुख उपस्थिती होती. आज पार पडलेल्या भरगच्च कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी जैवविविधता पदयात्रा आणि वन की बात युवाओंके साथ आयोजित करण्यात आली होती आणि वन संरक्षण, वन शाश्वतता आणि मानवी वन्यजीव संघर्ष या विषयांवर गटचर्चा करण्यात आली होती.

गटांनी त्यांचे विचार व्यक्त केले आणि तज्ज्ञांनी त्यांचे अनुभव आणि आजच्या संदर्भात त्याचा वापर शेअर केला. अकोला वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. कुमार स्वामी (आयएफएस), महेश खोरे, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अकोला. अमोल सावंत, 'निसर्ग कट्टा' अकोला, स्वयंसेवी संस्थाडॉ. सुरेश सुरडकर, सहाय्यक प्रा. महेशसिंग शेखावत, नेहरूयुवा केंद्र अकोला, डॉ. शैलेश हरणे, वनविद्या महाविद्यालय, अकोला, प्रा. एस. डब्ल्यू. चौधरी, यांनी सहभागींना मानवजातीसाठी वनाच्या भूमिकेबद्दल जागरूक करण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला.विविध महाविद्यालयांचे एकूण ७० विद्यार्थी आणि १० कर्मचारी सहभागी झाले होते.हा कार्यक्रम वनविद्या महाविद्यालय, अकोला, वन विभाग, अकोला, सामाजिक वन विभाग अकोला, राष्ट्रीय सेवा योजना, निसर्ग कट्टा एक स्वयंसेवी संस्था, नेहरू युवा केंद्र अकोला ईएफईसी एक स्वयंसेवी संस्था आदींचे संयुक्त सहभागातून यशस्वीरित्या पार पडला. तर विद्यार्थी सागर, ओम, यज्ञेश, धनंजय, प्रतीक, सोहेल, हितक्षी, पायल या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे उत्तम समन्वय साधले आणि सर्व टीटी मालिका, यूयू मालिका आणि डब्ल्यूडब्ल्यू मालिका टीम कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री, अकोला यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे उत्तम संयोजन केले.या कार्यक्रमासाठी गोड पदार्थ उदय वाझे, ईएफईसी अकोला यांनी प्रायोजित केले.

# विशेष शिबिराद्वारे २५० जात वैधता प्रमाणपत्रांचे वितरण

**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** जिल्हा जात पडताळणी समिती तर्फे १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत आयोजित विशेष शिबिरात एकूण २५० जात वैधता प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील समितीच्या कार्यालयात गुरुवारी (२० मार्च) शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्रुटीमुळे प्रलंबित असलेले अर्ज पूर्ततेनंतर निकाली काढण्यात आले, तसेच नविन अर्जही मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाले. सुनावणीद्वारे जातीविषयक पुरावे, कागदपत्रे पूर्तता करून घेण्यात आली. त्रुटी असलेल्या २८५ अर्जांपैकी २५० अर्जांची पूर्तता होऊन प्रमाणपत्रे शिबिराच्या माध्यमातून वाटण्यात आली. शिबिरात एकूण २०० विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र, तसेच ५० सेवाविषयक प्रकरणांमध्ये समितीमार्फत निर्णय ऑनलाईन प्रणालीद्वारे घेण्यात आले. अशी एकूण २५० प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.


समितीचे अध्यक्ष जितेंद्र काकुस्ते, उपायुक्त तथा सदस्य अमोल यावलीकर, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी स्वत: शिबिराला उपस्थित राहून अभ्यागतांच्या समस्यांचे निवारण केले. इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी शिबिर आयोजिण्यात आले. जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी समितीच्या कार्यालयाकडे अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वीजबिल भरा अन् गैरसोय टाळा;महावितरणचे जाहिर आवाहन

## सुट्टीच्या दिवसीही सुरू ठेवण्यात आली वीजबिल भरणा केंद्रे

**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** परिमंडळाअंतर्गत महावितरणला पुढील १० दिवसात २२३ कोटी वसूल करायचे आहे.त्यासाठी महावितरणने मोहिम तीव्र केली असून वसूलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांनी चालू तसेच थकीत वीजबिल भरावे आणि आपली गैरसोय टाळावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

चालू आर्थीक वर्षाचे केवळ १० दिवस शिल्लक आहे .प्रत्येक दिवसाला २० कोटी वसूल करायचे आहे.वसुलीसाठी कर्मचारीच नाही तर मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्यासह अधीक्षक अभियंता(बुलडाणा)सुरेंद्र कटके,अजय शिंदे वाशिम आणि अजितपालसिंह दिनोरे (अकोला),तसेच सर्व कार्यकारी अभियंते आपल्या संपूर्ण टिमसह वसूली मोहिमेत सहभागी झाले आहेत.



**सुट्टीच्या दिवशी वीज बिल भरणा केंद्रे सुरू**

थकबाकीदार ग्राहकांना वीजबिल भरण्याची सोय व्हावी व महावितरणच्या कारवाईमुळे त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी सुट्टीच्या दिवशी वीज बिल भरणा केंद्रे सुरू ठेवण्यात आली आहेत. www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व मोबाईल ॲपद्वारेही घरबसल्या कोठूनही वीज बिल भरता येते. ऑनलाइन वीज बिल भरल्यास वीज बिलामध्ये ०.२५ टक्के आणि पहिल्या सात दिवसांत (Prompt Payment) बिल भरल्यास १ टक्का असे एकूण १.२५ टक्के सूट मिळते. क्रेडिट कार्ड वगळता इतर पर्यायांद्वारे ऑनलाइनद्वारे होणारा वीज बिल भरणा नि:शुल्क आहे.

# शिधापत्रिकेसंबंधी कोणतेही कामकाज त्रयस्थामार्फत करूनका

## अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांचे आवाहन

**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** शिधापत्रिकेसंबंधी कोणतेही कामकाज कोणत्याही एजंट किंवा त्रयस्थ व्यक्तीमार्फत करू नये, असे आवाहन अन्नधान्य वितरण अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले आहे.

शिधापत्रिकेसंबंधी अर्ज कार्डधारकांकडून शासनाच्या आरसीएमएस पोर्टलवर पब्लिक लॉगइनद्वारे स्वत: किंवा कार्यालयात सकाळी १० ते २ या वेळेत प्रत्यक्ष हजर राहून सादर केली जातात. शहर पुरवठा कार्यालयामार्फत त्यासंबंधी नियमानुसार पुढील प्रक्रिया केली जाते. त्यामुळे कुणीही एजंट किंवा त्रयस्थ व्यक्तीमार्फत शिधापत्रिकेसंबंधी कामकाज करू नये. फसवणूक झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. शिधापत्रिकेच्या कामकाजासाठी केवळ कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा. ई–शिधापत्रिकांसाठी अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालयात स्वत: येऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### मनपाच्या पाणीपट्टी त्रुटींची दखल सुधारणा करण्याचे मनपा आयुक्तांचे आदेश

**अकोला :** महापालिकेच्या पाणीपट्टी देयकांमधील तांत्रिक त्रुटी आणि अन्यायकारक आकारणीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते निलेश देव यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन केले. त्यांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत नगर विकास विभागाच्या अवर सचिव विद्या हमप्या यांनी मध्यस्थी करत आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यानंतर अकोला महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. सुनील लहाने यांना पाणीपट्टी संदर्भातील त्रुटींची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले. सोमवार, १७ मार्चपासून सुरू झालेल्या या आंदोलनात, अकोलातील नागरिकांवर चुकीच्या आणि अन्यायकारक पद्धतीने पाणीपट्टी कर लादण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. अनेक नागरिकांच्या पाणीपट्टी देयकांमध्ये अनावश्यक वाढ झाली होती, तर काही ठिकाणी मीटर नसतानाही अवाजवी देयके आकारण्यात आली होती. या आंदोलनादरम्यान, निलेश देव आणि त्यांच्या सहका?यांना मुंबई पोलिसांनी काही काळ ताब्यात घेतले होते. मात्र, नंतर त्यांना आझाद मैदानावर आंदोलन सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली. २० मार्च रोजी अकोला महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत निलेश देव यांची बैठक झाली. या बैठकीत खालील महत्त्वाचे निणय घेण्यात आले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून पाणीपट्टी देयकांच्या अचूकतेची तपासणी केली जाईल, मीटर असलेल्या ग्राहकांच्या चुकीच्या रीडिंगची आणि मीटर नसतानाही लावण्यात आलेल्या शहानिशा अंदाजे बिलांची होईल, हद्दवाढ भागातील २०१९ मध्ये टाकण्यात आलेल्या पाईपलाईनची चौकशी, या भागातील पाणीपुरवठा प्रत्यक्ष कधी सुरू झाला, यानुसार देयक आकारणी केली जाईल, ज्यांना नळ कनेक्शन नाही त्यांची चुकीची बिलं रद्द केली जातील, ज्या मालमत्ता धारकांना प्रत्यक्ष नळजोडणी नाही, पण तरीही पाणीपट्टी आकारण्यात आली आहे, अशा नागरिकांची पडताळणी करून त्यांची बिले रद्द करण्यात येणार आहेत.

# अकोला येथील पत्रकार विठ्ठल महल्ले यांच्यावर भ्याड हल्ला तेल्हारा येथे निषेध



**तेल्हारा,दि २१ (प्रतिनिधी):** अकोला येथील क्राईम रिपोर्टर विठ्ठल महल्ले यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा मराठी पत्रकार परिषद संलग्न अकोला जिल्हा पत्रकार संघ शाखा तेल्हारा तालुका पत्रकार संघ व तालुक्यातील पत्रकारांनी तीव्र निषेध नोंदवून गुन्हेगारांना त्वरित अटक करून कारवाई ची मागणी तहसीलदार तेल्हारा व ठाणेदार तेल्हारा यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनानुसार आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपीवर कठोरात कठोर शासन व्हावे, जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून पोलिस प्रशासनाचा गुन्हेगारांवरील वचक कमी झाला आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याने पत्रकारांवरील हल्ले वाढणे गंभीर बाब आहे.विठ्ठलराव महल्ले यांच्यावरील हल्ला हा लोकशाहीवर हल्ला असल्याचे पत्रकारांनी म्हटले आहे. आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी पत्रकारांनी केली आहे. अन्यथा, तालुक्यातील पत्रकार आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रल्हादराव ठोकणे, सुरेश शिंगणारे, सत्यशील सावरकर, सदानंद खारोडे,प्रा.विद्याधर खुमकर, सुरेश सिसोदिया, शुभम सोनटक्के, राहूल मिटकरी, प्रा. कृष्णा फंदाट, पुरूषोत्तम इंगोले, निलेश जवकार, विशाल नांदोकार, अनिल जोशी, धर्मेश चौधरी, रामभाऊ फाटकर, अनिल अवताडे, सागर खराटे, अमित काकड, संदिप सोळंके, प्रशांत विखे, विजय घोडे, आनंद बोदडे, रवि शर्मा, अनंतराव अहेरकर उपस्थित होते.

### मनपात नोंद असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२५ पुर्वी हयात व वचनपत्र सादर करावे

**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** अकोला महानगरपालिकेच्या समाज कल्याण व विकास विभागाच्या माध्यामातून लाभ घेणा-या दिव्यांग लाभार्थ्यांनी मार्च नंतर ही लाभ सुरू ठेवण्याकरिता हयातीचा दाखला व अतिप्रदान झाल्यास परत करावयाचे वचनपत्र ३१ मार्च पुर्वी अकोला महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागात सादर करावे लागणार आहे. अकोला महानगरपालिकेच्या पुर्वीचा दिव्यांग विभाग व आता समाजकल्याण व विकास विभाग असे नामांतर झालेल्या विभागाच्या वतीने ४० टक्के पेक्षा अधिक दिव्यांगत्व असणा-या सुमारे पांच हजार लाभार्थ्यांना प्रतिमाह उदरनिर्वाह भत्ता देण्यात येतो. सोबतच दिव्यांग विवाहासाठीचे एकवेळ विवाह अनुदान सुध्दा दिले जाते. या सर्व लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र व वचनपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

# रामनवमी शोभायात्रा समिती कार्यालयाचा शुभारंभ



**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** आज रामनवमी शोभायात्रा समिती कार्यालयाचा शुभारंभ ओपन थिएटर च्या समोर, आर्य समाज मंदिरच्या बाजूला प्रचंड उत्साहात मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचे विधिवत मंत्रोपचारात पूजन करून करण्यात आला. सन१९८६ पासुन अकोला शहरात विश्व हिंदू परिषद ने रामनवमी शोभायात्रा सुरू केली, या शोभायात्रेचे स्वरूप दरवर्षी प्रचंड वेगाने वाढत आहे, यावर्षी सुद्धा अत्यंत उत्साहात रामनवमी शोभायात्रा अकोल्यात निघणार आहे, यामध्ये ५१ महिला व पुरुष भजनी मंडळ, ५१ देखावे (झाकी) व अकोला शहराचे भगवाकरण, रोशनाई करण्यात येणार आहे या सर्व कामाचे नियोजन करिता दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा विधीवत पूजन करून रामनवमी शोभायात्रा समिती कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले, या कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे अनेक पदाधिकारी व शहरातील गणमान्य व्यक्ती उपस्थित होते त्यामध्ये प्रामुख्याने वि.हिं.प.प्रांत सहमंत्री गणेश काळकर, वि.हिं.प. अकोला जिल्हाअध्यक्ष प्रकाशजी लोढीया, सर्वसेवाधिकारी कृष्णा शर्मा, शोभायात्रा समितीचे अध्यक्ष शैलेंद्र उर्फ बंटी कागलीवाल, कोषाध्यक्ष राहुल राठी, भाजपा जिल्हाअध्यक्ष किशोर मांगटे पाटील, बजरंग दल प्रांत सहसंयोजक सुरज भगेवार , रामनवमीचे माजी अध्यक्ष शैलेश खरोटे, विहिप विभाग मंत्री संजय दुबे उपस्थित होते.

# ११०८ मंदिरे बांधून पूजा करण्याच्या बरोबर आहे एक पार्थिव शिवलिंग बनविने

## श्री शिव महापुराण कथेच्या तिसऱ्या दिवशी बालकथा व्यास पं.कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुत्य वाणीतून ऐकावील्या शिव अवतार

**अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** १हजार १०८शिव मंदिरे बांधून पूजा करण्याचे पुण्य केवळ एक पार्थिव शिव लिंग बनवीण्यात आहे.भगवान शिवाला प्रसन्न करण्यासाठी महान भक्तीची गरज असते. ज्याप्रमाणे बालकाला दुखापत होते तेंव्हा बालक आई वडिलांना पुकारता त्याचं प्रमाणे मनात दुःख असताना शिवालाभक्तिमय आवाज दिला तर शिव भक्तांच्या संकटात धावून येतो. हे कथेद्वारे अनेक उदाहरणे देऊन श्री शिव महापुराण कथेच्या तिसऱ्या दिवशी बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुत्य वाणीतून त्यांनी शिव अवतार कथन केले. भगवान शिव दर्शन कुणालाही सहज मिळत नाही. दगडांना जया प्रमाणे घाव सहन



केल्यानंतर मूर्तीचा आकार मिळतो त्यानंतर त्या दगडाची पूजा केली जाते. त्याचं प्रमाणे मानवी जीवन असून अनेक घाव सहन करून तनआणि मनाने शिव आराधना केल्यावरच भगवान शिवाचे दर्शन होते. त्यांचसाठी श्री शिव महापुराण ऐकणे अती महत्वाचे असून श्री शिव महापुराण जीवनाचे सार असल्याचे कथेच्या दुसऱ्या दिवशी बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुत्य वाणीतून सांगण्यात आले होते .स्व. रामभाऊ हूसनाजी गवई व स्व. कलावतीबाई रामभाऊ गवई याचा स्मृतीतप्रिर्थ अनेक वर्षापासून भागवत कथेचे आयोजन करत आहेत. यामध्ये गेल्या २ वर्षापासून शिवपुराण कथेचे आयोजन भव्य दिव्य रूपात करत आहेत आपल्या आई–वडिलांच्या स्व.रामभाऊ हसनाजी गवई व .सौ. स्व. कलावतीबाई रामभाऊजी गवई स्मृती प्रित्यर्थ श्री राजराजेश्वर महाराजांच्या कृपेने भारत विद्यालयाच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणात आंतर राष्ट्रीय भागवत भूषण बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुत्य वाणीतून १९ मार्च रोजी प्रारंभ झाला असून बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुत्य वाणीतून अकोलसिंग राजा आणि दृष्टांत आणि अकोला शहराचे नामकरण तसेच दुसऱ्या दिवशी भगवान शिव आणि त्यांच्या मार्फत निर्मित रुद्राक्ष यांचे प्रकार आणि त्यांचे महत्व विषद केले. तर आज तिसऱ्या दिवशी १हजार १०८ शिवमंदिरे बांधून पूजा करण्याचे पुण्य केवळ एक पार्थिव शिवलिंग बनवीण्यात आहे. असे सांगत आज तिसऱ्या दिवशीच्या कथेची सांगता केली. २५ मार्चपर्यंत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत श्री शिवमहापुराण कथा सप्ताह आयोजित केली आहे.आज दुसऱ्या दिवशी रुद्राक्ष आणि त्यांचे निर्मिती आणि महत्व सोबतच शबरी आणि केवट यांना भगवान शिवाने जंगलात कसे दर्शन दिले.

शिव दर्शन होण्यासाठी प्रेम आणि मन ताकदवार करण्यासाठी नाम स्मरण मोठी ताकद असल्याचे सांगितले. तर भगवान शिव आणि राम तसेच श्रीकृष्ण आणि माँ यशोदा यांचे दर्शन मिळावीण्यासाठी शिवाने केलेल्या युक्त्या सांगितल्या. शहरातील भविकांनी भगवान शिवाची कृपा आशिर्वाद प्राप्त करण्याकरिता शिवमहापुराण कथेचे श्रवण करुन आपले जीवन कृतार्थ करावे असे आवाहन आयोजक मधुकरराव गवई सौ. मालतीबाई मधुकररावं गवई यांनी केले आहे.

# स्वच्छ पाणी हे जीवन, पण बिघडले तर ते विनाश

(जागतिक जल दिन विशेष २२ मार्च २०२५)

पाणी ही निसर्गाची सर्वात मोठी देणगी आहे कारण ती संपूर्ण सजीव जगाचा आधार आहे; त्याशिवाय जीवनाची कल्पना करणे निरर्थक आहे. पाण्याच्या समृद्धीमुळे जंगल, वृक्ष, वनस्पती आणि वन्यजीव समृद्धी वाढते. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध हवा मिळते. ऋतूचक्र, हवामान आणि निसर्गात संतुलन असते, अन्नाची गुणवत्ता आणि उत्पादन वाढते, त्याचा निसर्गाच्या प्रत्येक घटकावर थेट परिणाम होतो. जर सर्वांना पुरेसे शुद्ध पाणी मिळाले तर समृद्धी निश्चित आहे, परंतु जर हे पाणी अपुरे आणि प्रदूषित असेल तर हे पाणी विनाशाचे कारण आहे. जगातील सुमारे ९७ टक्के पाणी खारट आहे किंवा पिण्यायोग्य नाही. भारतात जगाची सर्वाधिक १८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्या तुलनेत, भारताकडे जगातील फक्त ४ टक्के जलसंपत्ती आहे, ज्यामुळे तो पाण्याच्या टंचाई असलेल्या देशांपैकी एक बनतो, त्यामुळे लोकांना याची किंमत आपल्या जीवाने मोजावी लागते, कारण दरवर्षी लाखो भारतीय दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारामुळे मरतात. द लॅन्सेटच्या एका अभ्यासानुसार, २०१९ मध्ये भारतात जल प्रदूषणामुळे ५,००,००० हून अधिक मृत्यू झाले.

दरवर्षी २२ मार्च रोजी जगभरात जागतिक जल दिन पाण्याचे महत्त्व आणि प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण करण्यास साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम 'हिमनदी संवर्धन' आहे, जी भविष्यासाठी या गोठलेल्या हिमनद्यांच्या जलस्रोतांचे जतन करण्यावर लक्ष केंद्रित करते. हिमनदी हा पाण्याचा एक मोठा साठा आहे, त्याचे वितळलेले पाणी पिण्यास, शेती, उद्योग, स्वच्छ ऊर्जा उत्पादन आणि निरोगी परिसंस्थेसाठी आवश्यक आहे, परंतु सतत जागतिक तापमानवाढीमुळे मोठे हिमनदी वितळत आहेत आणि ते वितळलेले शुद्ध पाणी समुद्राची पातळी वाढवत आहे. वेगाने वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे पाण्याच्या प्रवाहात अनिश्चितता निर्माण होत आहे, ज्याचा मानवांवर आणि ग्रहावर खोलवर परिणाम होत आहे. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन आणि कमी होत चाललेल्या हिमनद्यांना तोंड देण्यासाठी स्थानिक धोरणाची आवश्यकता आहे.

१५ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या वार्षिक जागतिक जोखीम अहवालाच्या २० व्या आवृत्तीत जागतिक आर्थिक मंचाने इशारा दिला आहे की भारताला एक गंभीर आव्हानाचा सामना करावा लागणार आहे कारण पुढील दोन वर्षांत (२०२५-२०२७) पाणीटंचाई हा देशासाठी सर्वात गंभीर धोका म्हणून उदयास येईल. शिकागो विद्यापीठाच्या एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे, ज्यामध्ये सर्वात मोठ्या वायु गुणवत्ता निर्देशांकानुसार, प्रदूषित वायु सरासरी आयुर्मान ३.६ वर्षांनी कमी करत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ३,५७५,००० लोक पाण्याशी संबंधित आजारांमुळे मृत्युमुखी पडतात. हे दर १० सेकंदाला एका मृत्यूइतके आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने सरकारला २०२४ च्या एका अभ्यासाची माहिती दिली आहे ज्यामध्ये असे आढळून आले आहे की पंजाबमधील प्रदूषित नद्या-नाल्यांजवळ राहणाऱ्या लोकांना कर्करोग होण्याची शक्यता जास्त असते. जल प्रदूषणाची मुख्य घटक म्हणजे औद्योगिक कचरा, सांडपाणी, सूक्ष्मजीव प्रदूषण, निलंबित पदार्थ, रासायनिक प्रदूषण, विरघळणारे प्रदूषक, किरणोत्सर्गी कचरा, औष्णिक प्रदूषण, मानवी कचरा, औद्योगिक उपक्रम, तेल प्रदूषण, कृषी प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, खाणकाम, घनकचरा, आम्ल पाऊस इत्यादी. ही विशेष घटक पाण्याच्या संपर्कात येताच पाणी विषारी बनवतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०२१ मध्ये, २ अब्जाहून अधिक लोक पाण्याची कमतरता असलेल्या देशांमध्ये राहत होते. २०२२ मध्ये, जगभरात किमान १.७ अब्ज लोकांनी विष्ठेने दूषित पिण्याच्या पाण्याचे स्रोत वापरले. विष्ठेमुळे



पिण्याचे पाणी दूषित होणे हे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका आहे. २०२१ मध्ये, २५१.४ दशलक्षाहून अधिक लोकांना शिस्टोसोमियासिससाठी प्रतिबंधात्मक उपचाराची आवश्यकता होती. सूक्ष्मजीव शास्त्रीय दृष्ट्या दूषित पिण्याच्या पाण्यामुळे अतिसार, कॉलरा, आमांश, टायफॉईड आणि पोलिओसारखे आजार होऊ शकतात आणि दरवर्षी अतिसाराशी संबंधित अंदाजे ५,०५,००० मृत्यू होतात असा अंदाज आहे. २९६ दशलक्ष लोक असुरक्षित विहिरी आणि झऱ्यांमधून पाणी घेतात आणि ११५ दशलक्ष लोक तलाव, नद्या आणि ओढ्यांमधून प्रक्रिया न केलेले पृष्ठभागावरील पाणी गोळा करतात.

जलद शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जलस्रोतांचे प्रदूषण वाढले आहे, ज्यामुळे ते वापरासाठी अयोग्य झाले आहेत. अकार्यक्षम शेती पद्धती, रसायनांचा अतिरेकी वापर, भूजलाचा अतिरेकी वापर, हवामान बदल, खराब पाणी व्यवस्थापन आणि योग्य पायाभूत सुविधांचा अभाव यासारखे अनेक घटक पाणीटंचाईचे संकट वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जागतिक बँकेच्या काही आकडेवारीनुसार, भारतात १६.३ कोटी भारतीयांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, २१ कोटी भारतीयांना सुधारित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाहीत. २१ टक्के संसर्गजन्य आजार हे असुरक्षित पाण्याशी संबंधित आहेत, भारतात दररोज पाच वर्षांखालील ५०० मुले अतिसारामुळे मृत्युमुखी पडतात. भारतातील अर्ध्याहून अधिक नद्या अत्यंत प्रदूषित आहेत आणि इतर अनेक आधुनिक मानकांनुसार असुरक्षित पातळीवर आहेत. शहरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी नाल्यांचे रूप धारण केले आहे. नीति आयोगाच्या २०१८ च्या संमिश्र जल व्यवस्थापन निर्देशांक अहवालात असे म्हटले आहे की दरवर्षी सुमारे दोन लाख लोक सुरक्षित पाण्याच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे मृत्युमुखी पडतात. २०३० पर्यंत, सुमारे ६० कोटी लोकांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, जे भारताच्या अंदाजे लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के असेल.



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

वॉटर या स्वयंसेवी संस्थेने म्हटले आहे की, भारतात, १.४ अब्ज लोकसंख्येपैकी, ३५ दशलक्ष लोकांना अजूनही सुरक्षित पाणी उपलब्ध नाही आणि ६७८ दशलक्ष लोकांना सुरक्षित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाही. दरवर्षी दहा लाखांहून अधिक लोक सुरक्षित पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे मृत्युमुखी पडतात आणि दर दोन मिनिटांनी एका मुलाचा पाणी किंवा स्वच्छतेशी संबंधित आजारांमुळे मृत्यू होतो. जगातील २९ टक्के शाळांमध्ये स्वच्छ पाणी आणि शौचालये यासारख्या मूलभूत गरजांचा अभाव आहे. पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दरवर्षी जागतिक स्तरावर २६० अब्ज डॉलर वाया जातात. जगातील किमान ५० टक्के लोकसंख्या वर्षातील किमान एक महिना पाण्याच्या तीव्र टंचाईत जगते. जगभरातील महिला, मुली पाण्यासाठी दररोज काही किलोमीटर चालतात आणि पाणी गोळा करण्यात २० कोटी तास घालवतात. घरात सुरक्षित पाणी आणि स्वच्छता उपलब्ध असल्याने वेळ वाचतो, यामुळे कुटुंबांना शिक्षण आणि कामाच्या संधी मिळविण्यासाठी अधिक वेळ मिळतो, ज्यामुळे त्यांना गरिबीचे चक्र तोडण्यास मदत होते.

जोपर्यंत एखाद्या गोष्टीची कमतरता नसते तोपर्यंत माणसाला त्या गोष्टीचे मूल्य कळत नाही, जीवन पाण्यावर अवलंबून असते, बहुतेक लोकांना पाणी मिळविण्यासाठी जास्त कष्ट करावे लागत नाहीत, त्यांच्या मते जगात पाणी सहज उपलब्ध आहे, कदाचित म्हणूनच लोकांना पाण्याचे मूल्य समजत नाही. कठीण परिस्थितीत पाणी उपलब्ध नसेल तर शरीर आणि मन अस्वस्थ होते. उन्हाळ्यात, जर काही कारणास्तव शहरांमधील लोकांना एक दिवसही पाणी मिळाले नाही, तर गोंधळ उडतो. मग तेव्हा पाणी ही जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट वाटते. आज आपल्याला सहज उपलब्ध होणारे पाणी, कोट्यवधी लोक त्या पाण्यासाठी दररोज भटकतात, ते पाणी गोळा करण्यात आपला मौल्यवान वेळ वाया घालवतात, तरीही त्यांना पुरेशा प्रमाणात शुद्ध पाणी मिळत नाही, नाईलाजाने अशुद्ध पाणी पिण्यामुळे ते प्राणघातक आजारांना बळी पडतात आणि अकाली जीव गमावतात. पाण्याअभावी प्राणी, पक्षी आणि वन्यजीवांची स्थिती अधिकच बिकट होते. पाण्याचा अपव्यय आणि योग्य व्यवस्थापनाद्वारे त्याची साठवणूक कशी होते हे आपल्या सर्वांना माहिती आहे पण त्याचे गांभीर्य आपल्याला समजत नाही. मौल्यवान पाण्याचे महत्त्व समजून घ्या. प्रत्येक व्यक्ती आणि जीवांचा शुद्ध पाण्यावर समान हक्क आहे. सर्वांना शुद्ध पाणी मिळावे ही आपली जबाबदारी आहे. पाणी वाचवा, मौल्यवान जीव वाचवा.

# जागतिक जल दिन

आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.






श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जल ही जीवन,जल ही अमृत संपूर्ण सृष्टीसाठी पाण्याचा एक-एक थेंब महत्त्वाचा

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे. कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे.कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो. भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे. आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही. पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही. म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.१९९२ ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी २२ मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.यानंत १९९३ मध्ये २२ मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले. विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा संकल्प दिवस सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते.आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे.कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे.आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण ७० टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही.सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते.त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात.त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील ५० टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. यामुळे आज जगात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे.त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसुन अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.जगात वाढते कारखाने, औद्योगिकीकरण, शहरीकरण, अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो.यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे.अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात ८० टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते.परंतु मानवाच्या अतीरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले तर या पृथ्वीतलावर २० वर्षांनंतर पीण्याकरीता एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे.आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे.याचा विचार कोणीच करीत नाही. परंतु जगातील संपूर्ण मानवजातीने हे लक्षात ठेवले पाहिजे की,जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण करीत आहोत. त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे.परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात. त्यामुळे आज गावात, शहरात, वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय.सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने मोठ्या प्रमाणात दिसून येतात.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोडुन (आटवुन) टाकले आहे.जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे.कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती.पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय, भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे,तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी, तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली ५० ते ६० फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते. त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे.मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत.हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली)गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन, इजरायल-गाजा-इराण- हिज्बुला युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे.यामुळे युक्रेनमध्ये आगेचा लोंढा दीसत होता.त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते.कठीण परिस्थिती पाहता जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे.अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. पाण्यासाठी अनेक देशांमध्ये हा!हा!कार! माजल्याचे दिसून येते.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय.आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.असे भाकीत आहे की २०० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही. संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे.जगात पुढे पाण्याचे भीषन संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी रहाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे.त्यामुळे कारखान्याचे दुषीतपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दुषीत पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे.पाण्याच्या स्त्रोतांचे होणारे प्रदुषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन हे दोन प्रश्न आहेत.यावर दुर्लक्ष सुरूच राहील्यास येणाऱ्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपण संपु,आपण संपलो तर जग संपेल! त्यामुळे विश्व जल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकांनी पाणी वाचविण्याचा संकल्पकेला पाहिजे. तेव्हाच पाणी वाचेल.त्याचप्रमाणे पाणी वाचवा देश वाचवा हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विश्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.



लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# औरंगजेबाची कबर पाडावी कि जपावी?

पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची पताका डौलत ठेवण्याची आणि स्वराज्याचे सर्वार्थाने रक्षण करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी केले. म्हणूनच त्यांच्या नावापुढे 'स्वराज्यरक्षक' ही उपाधी लावली जाते. मध्यंतरी 'स्वराज्यरक्षक संभाजी महाराज' या मालिकेतून छत्रपती संभाजी महाराजांचा भीमपराक्रम जनतेसमोर आणला गेला; मात्र पुढे या मालिकेनेही इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप निर्मात्यांवर करण्यात आला. संभाजी महाराजांविषयी इतिहासकारांनी लिहिलेल्या उलट सुलट बाबींमुळे महाराजांविषयीचा खरा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत कधी पोहोचलाच नाही. महाराजांच्या सडेतोड वृत्तीमुळे म्हणा किंवा कर्म-धर्म संयोगाने म्हणा, महाराजांचे अहित पाहणारे लोक दुर्दैवाने स्वराज्यातच निर्माण झाले होते. या सर्वांना छत्रपती संभाजी महाराज मात्र पुरून उरले. ज्या महाभागांनी स्वराज्याचे खाऊन स्वराज्याशी बेईमानी केली त्यांच्याच पुढच्या पिढीच्या काही लोकांनी इतिहासकार बनून संभाजी महाराजांविषयी खोटेनाटे लिहून महाराजांना बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. परिणामी एका असामान्य योध्याचा महत्पराक्रम अनेक पिढ्यांपासून झाकोळला गेला. ज्यामुळे आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातही संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यातच आटोपण्यात आला आहे. छत्रपती महाराजांची युद्धकुशलता आणि अफाट शौर्य पाहता हा योद्धा मुघलांच्या हाती लागणे कदापि शक्य नव्हते; मात्र गद्दारीची कीड लागलेल्या या महाराष्ट्रात एका गद्दारानेच महाराजांना मुघलांच्या हाती पकडून दिले. त्यानंतर औरंगजेबाने ४० दिवस नानाविध यातना देत संभाजी महाराजांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली हे स्पष्ट असतानाही मध्यंतरीच्या काळात ब्राह्मणद्वेषाची कावीळ झालेल्या काही आधुनिक इतिहासकारांनी संभाजी महाराजांची हत्या ब्राहमणांनी केली आणि त्यांचे मुंडके भाल्यात रोवून मिरवले त्याप्रीत्यर्थ गुढीपाडवा हा सण साजरा केला जात असल्याचा स्वयंघोषी इतिहास मांडला. गेल्या मासात प्रदर्शित झालेल्या 'छावा' या हिंदी चित्रपटाने छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास जगासमोर आणला. त्यांचा अतूट पराक्रम जनतेसमोर आणताना क्रूरकर्मा औरंग्याने महाराजांचे कशा प्रकारे हाल केले, त्यांना कशा यातना दिल्या आणि त्यांची कशी निर्घृणपणे हत्या केली हेही सर्वांसमोर आणले. या चित्रपटाने चित्रपट जगतात नवा इतिहास रचला. घरातील लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनीच हा चित्रपट पाहिला. चित्रपटगृहाच्या बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते आणि मनात औरंग्याविषयी पराकोटीचा द्वेष होता. या द्वेषाने पुढे उसळी घेतली आणि संभाजीनगरात असलेली औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी एकमुखाने होऊ लागली. ही मागणी सर्वसामान्य जनतेची होती. यामागे कोणतेही राजकारण नव्हते, होती ती केवळ सुडाची भावना आणि चित्रपट पाहून उमटलेली स्वाभाविक प्रतिक्रिया. ज्या क्रूरकर्माने आमच्या महाराजांची निर्दयीपणे हत्या केली त्याचे या महाराष्ट्रभूमीत उदात्तीकरण का केले जात आहे हा संतप्त सवाल प्रत्येकाच्या अंतर्मनात होता.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

महाराष्ट्रभूमी छत्रपती शिवरायांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाने पावन झालेली भूमी आहे. या महाराष्ट्रावर वक्रदृष्टीने पाहणाऱ्या, या भूमीवर हल्ले करून तिला लुटू पाहणाऱ्या प्रत्येक लुटारूंचे मनसुबे या भूमीतील पराक्रमी वीरांनी उधळून लावले आहेत आणि त्यांच्या कबरी या महाराष्ट्राच्या भूमीतच खणल्या गेल्या आहेत हे दर्शवण्याचे काम येथील लुटारुंच्या कबरी करत आहेत. आपल्या एका पिढीने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचे दर्शन पुढच्या पिढीला होण्यासाठी या कबरी शाबूत असायला हव्यात अशी भूमिका काही जाणकार मांडत आहेत. त्यामुळे त्या उखडून टाकण्याऐवजी त्यांचे उदात्तीकरण थांबवावे असे त्यांचे मत आहे. दुसरीकडे स्वराज्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या आणि छत्रपती शिवरायांच्या आज्ञेखातर पराक्रमाची शिकस्त करणाऱ्या अनेक रणधुरंधर मावळ्यांची स्मारके आज धूळ खात आहेत, अनेकांवर साधे पत्र्याचे छतही नाही, अनेक ठिकाणी नियमित दिवाबत्तीही केली जात नाही, अनेक स्मारकांच्या आजूबाजूला रान वाढलेले आहे, स्मारकापर्यंत जाण्यासाठी पायवाटा केलेल्या नाहीत, दुसरीकडे महाराष्ट्राला लुटायला आलेल्या, हिंदूंची बलस्थाने असलेली पुरातन मंदिरे उध्वस्त करणाऱ्या, देवीदेवतांच्या मुर्त्या फोडणाऱ्या, येथील बायाबापड्यांच्या अब्रूवर घाला घालून त्यांना जनानखान्यात डांबणाऱ्या, तलवारीच्या बळावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या लुटारुंच्या कबरी मात्र दिवसागणिक अधिकाधिक समृद्ध होत आहेत, काही एकर जमिनींवर त्या पसरल्या आहेत, एखादा शाही राजवाडा वाटावा अशा प्रकारचे सुशोभीकरण त्या ठिकाणी केले गेले आहे, भोवताली अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत, या लुटारूंना संतांच्या उपमा देऊन त्यांचे उरूस काढले जात आहेत, त्यांच्या कबरीवर चादर चढवण्यासाठी रांगा लागत आहेत, तिथे जाऊन लोक नवस करत आहेत, एका समाजाला खुश करण्यासाठी अनेक राजकारणी जाऊन तिथे माथा टेकत आहेत. शिवप्रभूंच्या महाराष्ट्रात हा पराकोटीचा दुजाभाव तळपायाची आग मस्तकात नेणारा आहे. त्यामुळे या लुटारूंचे उदात्तीकरण तत्परतेने थांबवून राज्यातील मावळ्यांची स्मारके दुरुस्त करावीत आणि त्याठिकाणी नियमित दिवाबत्तीची सोय करावी, मावळ्यांच्या पराक्रमाचा इतिहास ठळक अक्षरांत त्या ठिकाणी मांडावा, आजूबाजूचा परिसर सुशोभित करावा अशी मागणी काही इतिहासप्रेमी करत आहेत. प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधण्यात आलेल्या अफजलखानाच्या थडग्याशेजारी गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते. इतिहासप्रेमी आणि हिंदुत्ववादी संघटना यांच्या नियमित पाठपुराव्यामुळे सध्याच्या सरकारला ते अनधिकृत बांधकाम पाडावे लागले. औरंगजेबाच्या कबरीबाबतही सध्या तिच परिस्थिती असून त्याठिकाणीही मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम उभे राहिले आहे त्यामुळे औरंगजेबाची कबर तशीच ठेवून आजुबाजुचे अनधिकृत बांधकाम पाडावे, संरक्षित स्मारकांच्या यादीतून औरंगजेबाच्या कबरीचे नाव काढावे आणि औरंगजेबाचे होत असलेले उदात्तीकरण थांबवावे अशी मागणी आज हिंदुत्ववादी संघटना करत आहेत. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला असून पुढील काही काळात जे अफझलखानाच्या कबरीबाबत करण्यात आले तेच औरंगजेबाच्या कबरीबाबतही करावे अशी इतिहासप्रेमी आणि हिंदुत्ववाद्यांची अपेक्षा आहे !



# बालांगण

## आता आला पेटफोन



तंत्रज्ञानात खूप वेगाने बदल होत असल्याचे तुम्ही जाणता. याचाच एक भाग म्हणून 'ग्लोकलमी' नावाच्या कंपनीच्या पेटफोनकडे बघावे लागेल. या कंपनीने चक्क पाळीव प्राण्यांसाठी स्मार्टफोन सादर केला आहे. यामुळे द्वि-मार्गी संवाद शक्य होतो. अलिकडेच प्रदर्शित झालेल्या या उपकरणात भुंकण्यासारखे अनेक प्रकारचे आवाज वा प्राण्यांच्या क्रिया ओळखण्याची सुविधा देण्यात आली आहे. मालकांना पाळीव प्राण्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यास मदत करण्यासाठी यातील ट्रॅकिंग यंत्रणा उपयुक्त ठरणारी आहे.

खरेतर पेटफोन म्हणजे पाळीव प्राण्यांना लावली जाणारी एक प्रकारची कॉलर आहे. ती पाळीव प्राण्यांनी काढलेले वेगवेगळे आवाज ओळखू शकते. यद्वारे, पाळीव प्राण्यांचे मालक त्यांच्या मनःस्थितीचे निरीक्षण करू शकतात आणि आणि साउंड प्ले वैशिष्ट्यामुळे त्यांना प्रतिसाद देऊन किंवा सांत्वन देऊन शांतही करू शकतात. याव्यतिरिक्त पेटफोन जीपीएस, एजीपीएस, एलबीएस, वाय-फाय, ब्लूटूथ यांनीही युक्त आहे. त्याचबरोबर यातील ॲक्टिव्ह रडार नामक वैशिष्ट्यांद्वारे पाळीव प्राण्याचे लाईव्ह लोकेशन ट्रॅक करणेही शक्य होते. एकूणच पाळीव प्राण्यांसाठी डिझाइन केलेला हा पहिला स्मार्टफोन आहे, असे आपण म्हणू शकतो. याद्वारे मालक त्यांच्या पाळीव प्राण्यांचा माग शोधू शकतात. हे काम एका क्लिकवर होते. यात एक जिओफेन्स फीचर देखील आहे, जे पाळीव प्राणी सुरक्षित क्षेत्राबाहेर गेल्यावर अलर्ट पाठवते. खेरीज प्राणी अंधाऱ्या जागी असे तर उपकरणातून एक प्रखर प्रकाशझोत टाकला जातो.

**नवीन काय ?**

यामुळे पाळीव प्राणी अंधारातही शोधता येतो. याच्या साह्याने पाळीव प्राण्यांचे प्रोफाइल तयार करता येते. ज्यामध्ये पाळीव प्राण्यांची माहिती, आरोग्यविषयक माहिती, काही उपचार सुरू असल्यास त्याची माहिती आणि त्याच्या खाण्याच्या पद्धती वा सवयी या सर्वांची सविस्तर माहिती असते. हे डिव्हाइस सगळा तपशील सांभाळते आणि हवा तेव्हा समोर मांडते. इतकेच नव्हे तर ते पाळीव प्राण्यांना आराम देण्यासाठी संगीतदेखील ऐकवू शकते.

## अनोखे आविष्कार

छोट्या दोस्तांनो, जगातील चित्र-विचित्र तंत्रज्ञानाविषयी आज आपण जाणून घेऊ या...



* 'क्रोमविले'च्या एका ॲपद्वारे कागदावरचं कोणतंही चित्र तुम्ही थ्रीडी स्वरुपात पाहू शकता. हे ॲप डाऊनलोड केल्यानंतर मोबाइल किंवा टॅब चित्रासमोर धरल्यावर चित्राला थ्रीडी इफेक्ट मिळेल. यासोबतच अभ्यासाशी संबंधित चित्राची सगळी माहितीही गॅझेटवर दिसू लागेल.

* हॉटेलमधून घरी काही मागवलं किंवा सुपर मार्केटमधून खरेदी केल्यावर तिथला माणूस घरी सामान पोहोचवतो. पण लवकरच हे काम रोबो करताना दिसेल. 'स्टारशिप' या कंपनीनं अनोखा 'डिलिव्हरी रोबो' तयार केलाय. हा रोबो स्वतःच रस्ता शोधून गर्दीतूनही वाट काढू शकेल. याचं नियंत्रण ॲपद्वारे करता येतं.

* पापड, बिस्किटं यासारखे पदार्थ कारखान्यांमध्ये तयार होतात. पण हे पदार्थ प्रिंट झाले तर? 'नॅचरल मशीन्स' या कंपनीनं असं एक उपकरण तयार केलंय. हा थ्रीडी फुड प्रिंटर आहे. त्याला 'फुडिनी' असं नाव देण्यात आलंय. फुडिनीला मोबाइलमधल्या ॲपशीही जोडता येतं.

* दोस्तांनो, तुम्हाला हस्तकला आवडते ना? तुम्ही तयार केलेल्या वस्तू किंवा खेळणी तुमच्या इशाऱ्यावर चालू लागली तर? धम्माल येईल ना? यासाठीच 'कॅमीबॅट' नावाचा एक रोबो तयार करण्यात आलाय. या रोबोवर कागद ठेऊन हवा तो आकार मिळवता येतो. ॲपद्वारे तुम्ही रोबोच्या हालचालींवर नियंत्रण ठेऊ शकता.

**वाचा तर खरं**

* मेसेज टाईप करण्यासाठी आपल्याला स्क्रीनला टच करावं लागतं. काही स्मार्टफोन्समध्ये ऑडियो टेक्नॉलॉजीचा वापरही होतो. पण आता तुम्ही डोळ्यांनीही लिहू शकता. यासाठी 'आयरिसबॉंड' नावाचं ॲप विकसित करण्यात आलंय. तुमच्या फोनच्या की बोर्डवर लक्ष केंद्रित केलं की अक्षरं आपोआप टाईप होतील. आहे ना मज्जा!

## दिवसाची सुरूवात प्रसन्न हवी



छोट्या दोस्तांनो, सकाळची वेळ ही दिवसातील सर्वात महत्त्वाची वेळ असते. विशेषतः तुम्हा मुलांसाठी हा काळ योग्य रित्या घालवणे, दिवसाची चांगली सुरुवात करणे अत्यंत गरजेचे असते. हे साधले तर तुम्हाला संपूर्ण दिवसासाठी पर्याप्त ऊर्जा मिळतेच खेरीज तुमचा मूडही चांगला राहतो. म्हणूनच आत्तापासूनच सकाळची दिनचर्या पाळण्याची सवय लावून घ्या.

हे साधायचे असेल तर खालील गोष्टी सकाळी अजिबात करू नका. चला, त्याविषयी जाणून घेऊ या.

* सकाळी उठल्याबरोबर कधीही मोबाईल फोन किंवा टॅब्लेट वापरू नका. यामुळे लक्ष दुसरीकडे जाते आणि अभ्यासावर किंवा इतर महत्त्वाच्या कामावर तुम्ही लक्ष केंद्रित करू शकत नाही.



**लाईफस्टाईल**

* मुलांनो, सकाळी जंक फूड खाणेदेखील थांबवा. कारण याचा तुमच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो आणि दिवसभर सुस्ती वाटू शकते.

* अनेक मुले शाळेत जाण्याच्या घाईत नाश्ता करणे टाळतात. मात्र यामुळेही तुमचा दिवस चांगला जात नाही कारण नाश्ता हा दिवसातील सर्वात महत्त्वाचा आहार असतो. तोच वगळला तर दिवसभर तुम्ही बेचैन राहू शकता.

* सकाळी भावंडांशी वा घरातील इतर कोणाशी भांडणे किंवा नकारात्मक बोलणेही तुम्ही टाळायला हवे. कारण सकाळी कोणाशी वाद झाल्यास तुमचा मूड बिघडू शकतो. त्यानंतर दिवसभर तुम्ही चिडचिडे राहू शकता.

* मुलांनो, कधीही सकाळी उठल्यावर लगेचच टीव्ही पाहू नका. यामुळे तुमचा बहुमोल वेळ वाया जातोच त्याचबरोबर अभ्यासावर किंवा इतर महत्त्वाच्या कामांवर तुम्ही लक्ष केंद्रित करू शकत नाही.

* सकाळी उठल्यानंतर बॅग, गणवेश आणि इतर आवश्यक वस्तू जमवून घ्या. हे तयार असले तर नंतर तुमची धांदल होणार नाही.

* समळ्यात महत्त्वाचे म्हणजे लवकर झोपून लवकर उठण्याची सवय लावून घ्या. लवकर उठल्यानंतर दिवसाचा बराच काळ तुमच्या हातात राहतो. हा काळ तुम्ही अनेक चांगल्या गोष्टींसाठी सत्कारणी लावू शकता.




## अशी करा धमाल

छोट्या दोस्तांनो, सध्या परीक्षांचा माहोल आहे. एप्रिलच्या मध्यापर्यंत तुम्ही सगळेजण बिझी आहात. अभ्यासात तुम्ही गुंतलेले असाल हे तर खरं! पण परीक्षा संपली की तुम्ही मोकळे होणार आहात. मग धम्माल करायला सुरूवात होईल. तुमच्यापैकी अनेकांनी भटकंतीचा प्लॅनही केला असेल. मस्तपैकी फिरायला जाणार असाल. पण उन्हाळ्यात कुठे बाहेर जायचं असं म्हणून तुमच्यापैकी काहीजण घरीच धमाल करणार असतील. दोस्तांनो, सुट्टीसाठी काही उद्योग हवेतच. तुम्ही घरच्या घरी काही तरी करण्याचे पर्याय धुंडाळत असाल. अशा वेळी बबल पेंटिंग करून तुम्ही छान टाईमपास करू शकता.

**नियोजन**

**साहित्य** : कागद मावेल एवढा ट्रे किंवा बाऊल, रंग, साबण, स्ट्रॉ आणि कागद

**कृती** : एका ट्रेमध्ये रंग घाला. यातच लिक्विड सोप घाला. यात आता तुम्हाला पाणी घालायचं आहे. साबणाच्या पाण्यात फुगे तयार होतात. असे फुगे तयार होईपर्यंत पाणी घालावे लागेल. स्ट्रॉचा वापर करून तुम्ही फुगे तयार करू शकता. आता यावर अलगद कागद ठेवा. कागद पाण्यात भिजणार नाही याची काळजी घ्या. कागदावर फुग्यांची नक्षी उमटायला हवी. अशाच प्रकारे नक्षीकाम करत राहा. वेगवेगळ्या प्रकारचे रंग यात मिसळता येतील. हे पेंटिंग करताना तुम्हाला खूपच धम्माल येईल.




## दूध का तापवायचे?

छोट्या मित्रांनो, बराच काळ दूध तापवले नाही आणि चुकीने फ्रीजच्या बाहेर राहिले तर ते फाटते वा खराब होते, हे तुम्ही जाणत असाल. त्यावरुन आईची होणारी चिडचिडही तुम्ही पाहिली असेल. पण तेच दूध उकळल्यावर जास्त काळ खराब होत नाही. हे का घडते, माहिती आहे का? तुम्हालाही हे रहस्य समजून घ्यायचे असेल ही माहिती अवश्य वाचा.

मुलांनो, दुधामध्ये नैसर्गिकरित्या अनेक प्रकारचे बॅक्टेरिया असतात. त्यापैकी काही चांगले असतात तर काही वाईट असतात. दूध खोलीच्या सामान्य तापमानात ठेवले जाते तेव्हा त्यातील काही बॅक्टेरिया वेगाने वाढू लागतात आणि लॅक्टिक ॲसिड तयार करतात. हे लॅक्टिक ॲसिड पुढची करामत घडवून आणते. जसे की, हे आम्ल दुधातील केसीन नावाचे प्रथिन गोठवण्याचे काम करते. केसीन विघटित होऊ लागते तेव्हा दूध फाटते म्हणजेच ते दह्यासारखे घट्ट होऊ लागते. उन्हाळ्यात ही प्रक्रिया आणखी जलद होते, कारण उष्ण तापमानात जीवाणूंना वाढण्यासाठी अनुकूल परिस्थिती मिळते. हेच कारण आहे की उन्हाळ्यात दूध रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले नाही तर ते काही काळातच खराब होते. म्हणूनच मग दूध लगेचच तापवले जाते. यामागे ते जास्त काळ टिकावे, हा हेतू असतो.



**असं का होतं?**

आपण दूध उकळतो तेव्हा त्यात असणारे बहुतेक बॅक्टेरिया आणि एंजाइम नष्ट होतात. दुधात लॅक्टिक ॲसिड तयार होण्याची प्रक्रियाही मंदावते आणि ते लवकर खराब होत नाही. याशिवाय उकळल्याने दुधाची पीएच पातळी देखील संतुलित होते आणि ते बराच काळ ताजे राहते. त्यामुळेच चांगले उकडलेले दूध रेफ्रिजरेटरशिवायही काही तास चांगले राहू शकते.

दोस्तांनो, आपल्यातले अनेकजण जीमेल वापरतात. गुगल आपल्या सेवांमध्ये नवनव्या तंत्रज्ञानाची भर घालत असते. युजर्सना जीमेल सहज वापरता यावं असा गुगलचा प्रयत्न असतो. त्याबद्दल जाणून घेऊ या...


* दोस्तांनो, स्मार्टफोनवरून जीमेल ऑपरेट करताना कंटेंट बोल्ड, इटॅलिक अंडरलाईन किंवा हायलाईट करणं खूप कठीण असायचं. पण 'रिच टेक्स्ट सपोर्ट' ॲड केल्यामुळे स्मार्टफोनवरून मेल पाठवणं आता सोपं झालं आहे.

* जीमेलसोबतच याहू, हॉटमेल किंवा इतर सेवांचा वापर तुम्ही करत असाल तर प्रत्येक मेल उघडायची गरज नाही. जीमेलच्या इनबॉक्समध्येच इतर आयडीवरचे मेल्स पाहता येतील. 'जीमेफिलाई' असं या फीचरचं नाव आहे.

* संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम तुम्ही जीमेल ॲपवर बघू शकता. गुगल कॅलेंडरला प्रतिसाद देणं गुगलनं अत्यंत सोपं करून टाकलंय. त्यामुळे तुमची धावपळ होणार नाही.

* तुम्हाला टीएलएस इंस्क्रीप्शन अलर्ट मिळू शकेल. एखाद्याचा ईमेल टीएलएस इंस्क्रीप्शनला सपोर्ट करत नसेल तर तुटलेल्या कुलुपासारखा एक आयकॉन तुम्हाला मेसेज बॉक्समध्ये दिसेल.


## हे माहिती आहे?




**जाणून घ्या**

* तुमच्या आयडीवर बनावट मेल आली तर प्रश्नचिन्ह दिसू लागेल. यामुळे तुमची मेल सुरक्षित राहण्यास मदत होईल.

**ठिपके जुळवा**



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) २०१९ च्या क्रिकेट विश्वचषकाचं विजेतेपद कोणत्या संघाने पटकावलं?

२) २०२२ च्या विम्बल्डन स्पर्धेत पुरुष एकेरीचं विजेतेपद मिळवणार खेळाडू कोण?

३) डीडीटीचा शोध कोणी लावला?

४) सिंपसन आणि हॅरिसन यांनी कशाचा शोध लावला?

५) उस्ताद अमजद अली खान कोणतं वाद्य वाजवतात?

६) ऑलिम्पिक स्पर्धेत बॅडमिंटनमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय खेळाडू कोण?

७) भारतीय नौदलातली पहिली महिला पायलट कोण?

८) 'लॅंड ऑफ थाउसंड लेक्स' या नावाने ओळखला जाणार देश कोणता?

९) कांदा खाण्याची स्पर्धा कोणत्या देशात भरवली जाते?

१०) सौरमालेचा शोध कोणी लावला?

उत्तरे: १) इंग्लंड २) नोवाक जोकोविच ३) पॉल मुल्लर ४) क्लोरोफॉर्म ५) सरोद ६) सायना नेहवाल ७) प्रेम माथुर ८) फिनलंड ९) इंग्लंड १०) कोपर्निकस

**महत्वपूर्ण...**

### फळे खा, ऊर्जा मिळवा

आता उन्हाळा चांगलाच तापू लागला आहे. या उष्ण काळात फळांचे सेवन गरजेचे ठरते. या काळात फलाहार हा एक महत्त्वाचा आहार आहे कारण त्यात शरीराला आवश्यक असणारी अनेक पोषणतत्त्वे असतात. म्हणूनच तुम्हा मुलांनी उन्हाळ्यात ताज्या आणि रसाळ फळे खाणे फायदेशीर ठरते. आंबा, पपई, कलिंगड, सफरचंद आणि स्ट्रॉबेरी अशी रसदार आणि गोड फळे या काळात तुमच्यासाठी अत्यंत चांगली आहेत. आंब्यात बरीच व्हिटॅमिन्स तर पपईत फायबर आणि ॲंटीऑक्सिडंट्स असतात. कलिंगडात पाणी भरपूर असते जे शरीराला हायड्रेट ठेवते. म्हणजेच या सर्व फळांमध्ये शरीरासाठी आवश्यक ऊर्जा पुरवणारे महत्त्वपूर्ण घटक असतात. म्हणूनच या फळांवर ताव मारा आणि ताजेतवाने आणि निरोगी राहा.



**ऋतू बदल...**

### टॅनिंग टाळण्यासाठी...



उन्हाळ्यात तुम्हा मुलांची त्वचा अतिशय संवेदनशील बनते. त्यामुळे तुम्ही काळजी घेणे आवश्यक आहे. त्वचेला सूर्याच्या तीव्र उष्णतेपासून, धगीपासून वाचवण्यासाठी बाहेर जाताना न विसरता सनस्क्रीन लावा. चेहऱ्यावर आणि हातावर हलक्याने सनस्क्रीनचा थर पसरवा. मुख्य म्हणजे थोड्या थोड्या वेळाने गार पाणी प्या. यामुळेही तुमच्या शरीरातील पाण्याची योग्य मात्रा टिकून राहणे शक्य होईल. उन्हाळ्यात त्वचा होरपळते. टॅन होते आणि काळपट रंग येतो. हे टाळण्यासाठी या दिवसांमध्ये त्वचेची योग्य स्वच्छता ठेवा. रोज थंड पाण्याने दिवसातून दोनदा आंघोळ करा. यावेळी सौम्य साबण वापरा. हे उपाय उन्हाळ्यात तुमची त्वचा निरोगी ठेवतील.

**नवे जग...**

### अशी टिकवा पुस्तके

आता परीक्षेचा काळ संपत आला आहे. लवकरच तुम्ही सुट्टीचा आनंद घेण्यासाठी सज्ज व्हाल. मात्र त्यापूर्वी जुनी पुस्तके जपण्यासाठी काही सोप्या टिप्स नक्की लक्षात घ्या. पहिली गोष्ट म्हणजे वर्षभर वापरलेली पुस्तके स्वच्छ आणि कोरड्या जागी ठेवा. ओलावा असल्यास पुस्तके खराब होऊ शकतात. पुस्तके एका योग्य आकाराच्या रॅकवर किंवा शेल्फवर ठेवा. तिथे ती दबलेली किंवा वाकलेली राहणार नाहीत याची काळजी घ्या. पुस्तकांना दुर्गंध येऊ नये किंवा कीटकांचा त्रास होऊ नये म्हणून काही काळाने त्यांना हवेशीर ठिकाणी ठेवा. पुस्तकांचे कव्हर फाटले असेल तर पुन्हा घाला म्हणजे ती जास्त काळ टिकतील. अशा प्रकारे जुनी पुस्तके तुम्ही संदर्भासाठी वापरू शकता किंवा कोणा गरजूला देऊ शकता.



# परदेशी गुंतवणूकदार परतले
# शेअर बाजारात सलग पाचव्या दिवशी तेजी



मुंबई, दि.२१ प्रतिनिधी

डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची मजबूत स्थिती आणि परदेशी गुंतवणूकदारांकडून सुरु झालेल्या खरेदीच्या जोरावर शुक्रवारी भारतीय शेअर बाजाराने सलग पाचव्या दिवशी तेजी नोंदवली. सेन्सेक्स ५५७ अंकांनी वाढून ७६,९०५ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १५९ अंकांच्या वाढीसह २३,३५० वर स्थिरावला.

सेन्सेक्स- निफ्टीची आज कमकुवत सुरुवात झाली होती. पण परदेशी गुंतवणूकदारांनी विक्री कमी करुन खरेदीवर जोर दिल्याच्या आशावादामुळे दोन्ही निर्देशांकांनी तेजीच्या दिशेने चाल केली.

क्षेत्रीय पातळीवर कंझ्यूमर ड्युरेबल्स आणि मेटल वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले. ऑईल आणि गॅस, मीडिया, टेलिकॉम हे निर्देशांक प्रत्येकी २ टक्क्यांनी वाढले. निफ्टी बँक आणि निफ्टी फायनान्सियल सर्व्हिसेस प्रत्येकी १ टक्के वाढले. बीएसई मिडकॅप १.१ टक्के आणि स्मॉलकॅप २ टक्के वाढला.

बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २१ मार्च रोजी ४.७८ लाख कोटींनी वाढून ४१३.३९ लाख कोटींवर पोहोचले. बीएसईवर आज तेजीसह बंद झालेल्या शेअर्सची संख्या अधिक राहिली. बीएसईवर एकूण ४,१६२ शेअर्समध्ये व्यवहार दिसून आला. त्यातील २,८२४ शेअर्स तेजीत राहिले. तर १,२१२ शेअर्समध्ये घसरण झाली. दरम्यान, १२६ शेअर्स कोणत्याही चढ-उताराविना बंद झाले.

सेन्सेक्सवर एनटीपीसी, बजाज फायनान्स, कोटक बँक, नेस्ले इंडिया, सन फार्मा, टाटा मोटर्स, एलटी, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, भारती एअरटेल, पॉवर ग्रिड हे शेअर्स १ ते ३ टक्के वाढले. तर इन्फोसिस, एम अँड एम, टाटा स्टील, टायटन हे शेअर्स प्रत्येकी १ टक्के घसरले.

निफ्टीने गेल्या चारही सत्रांत वाढ नोंदवली आहे. निफ्टीची ही सात आठवड्यांतील सर्वात चांगली कामगिरी आहे. आजच्या वाढीसह या आठवड्यात निफ्टी सुमारे ४ टक्के वाढला.

**सेन्सेक्स 76,905**

**निफ्टी 23,350**

'एनएसई'वरील आकडेवारीनुसार, २० मार्च रोजी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पुन्हा निव्वळ खरेदीदार बनले. त्यांनी एका दिवसात ३,२३९.१४ कोटी रुपयांच्या भारतीय शेअर्सची खरेदी केली. तर देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांचा विक्रीवर जोर राहिला. त्यांनी ३,१३६ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. यंदा आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी १.६५ लाख कोटींच्या शेअर्सची विक्री केली. तर देशातंर्गत गुंतवणूकदारांनी १.८५ लाख कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली.

आज गुंतवणूकदारांच्या भावना उंचावण्यात भारतीय रुपयाचीही महत्त्वाची भूमिका राहिली. आज भारतीय रुपया १४ पैशांच्या वाढीसह खुला झाला. त्यानंतर तो आणखी मजबुतीसह बंद झाला. या आठवड्यात रुपया जवळपास १ टक्केने वाढला आहे. आज दिवसभरात रुपया ४१ पैशांनी वधारला आणि तो ८६.३६ रुपयांवर बंद झाला. विशेष म्हणजे जानेवारीनंतर पहिल्यांदाच रुपया मजबूत स्थितीत दिसून आला आहे.

# कर्नाटक विधानसभेत मुस्लिम आरक्षण विधेयक मंजूर
# मोठा गदारोळ, अध्यक्षांसमोर कागदपत्रे भिरकावली

बंगळुरू, दि. २१ वृत्तसंस्था

हनी ट्रॅप प्रकरणावरून कर्नाटक विधानसभेत शुक्रवारी मोठा गदारोळ झाला. भाजपचे आमदार सभागृहाच्या वेलमध्ये शिरले आणि त्यांनी अध्यक्षांच्या खुर्चीसमोर कागदपत्रे फाडली आणि भिरकावली. या गोंधळामुळे कर्नाटक विधानसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. दरम्यान, या गोंधळातच राज्य सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले. भाजपने हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत त्याला कायदेशीररित्या आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे.

काही मंत्र्यांसह प्रभावी नेत्यांना हनी ट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा विषय सध्या कर्नाटक विधानसभेत गाजला आहे. आज शक्रवारीदेखील या प्रकरणाचे



पडसाद विधानसभेत उमटले. एका वरिष्ठ मंत्र्यांसह ४८ जणांशी संबंधित हनीट्रॅप प्रकरणाच्या आरोपांवरून विरोधकांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना लक्ष्य केले. यावरुन कर्नाटक विधानसभेत प्रचंड गोंधळ उडाला.

"हा एका पक्षाचा मुद्दा नाही. तर जनतेसाठी काम करणाऱ्या आमदारांविरुद्ध हा मोठा कट रचला जात आहे. काही जण छुप्या अजेंडासह हनी ट्रॅप करत आहेत," असे विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी सांगितले.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी, हनीट्रॅप प्रकरणी कोणालाही संरक्षण दिले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी असेही नमूद केले की जी परमेश्वरा यांनी के. एन. राजण्णांच्या आरोपांची यापूर्वीच दखल घेतली आहे. या प्रकरणी चौकशी सुरू असल्याचे ते म्हणाले.

कायद्यानुसार, दोषींना शिक्षा व्हायलाच हवी. गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे की जर राजण्णा यांनी तक्रार केली तर उच्चस्तरीय चौकशी केली जाईल. या प्रकरणी राजण्णा यांनी कोणाचेही नाव घेतलेले नाही. जर त्यांनी कोणाचे नाव घेतले तर कारवाई केली जाऊ शकते. या प्रकरणात कोणालाही संरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही," असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले.

## एअर इंडियाच्या विमानात प्रवाशाचा मृत्यू; लँडिंगनंतर घटना उघडकीस

लखनौ, दि. २१ वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील चौधरी चरण सिंह आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर इंडिया फ्लाइट AI2845 मध्ये एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. हे विमान सकाळी 8:10 वाजता दिल्लीहून लखनौला पोहोचले. मृत प्रवाशाची ओळख आसिफुल्ला अंसारी म्हणून झाली आहे. त्यांच्या मृत्यूचे कारण पोस्टमार्टम अहवालानंतर स्पष्ट होईल.

विमान लखनौमध्ये पोहोचल्यानंतर क्रू मेंबर्सनी प्रवाशांना सीट बेल्ट काढून उतरायला सांगितले. मात्र, आसिफुल्ला अंसारी आपल्या सीटवर हालचाल न करता बसून राहिले. क्रू मेंबर्सनी त्यांना जागे करण्याचा प्रयत्न केला, पण ते कुठलाही प्रतिसाद देत नव्हते. डॉक्टरांना बोलावण्यात आले, त्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. विशेष म्हणजे, विमान लँड झाल्यानंतरही त्यांनी सीट बेल्टही काढला नव्हता, त्यामुळे त्यांच्या प्रवासादरम्यानच मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.





या संशयास्पद मृत्यूमुळे पोलीस अधिक तपास करत आहेत. प्रवाशाची तब्येत आधीपासून बिघडलेली होती का किंवा प्रवासादरम्यान काही आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या का, हे शोधले जात आहे. तसेच, त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून वैद्यकीय इतिहासाची माहिती घेतली जात आहे. पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.

## शरीर संबंध ठेवण्यासाठी पत्नी पैशांची मागणी करते, पतीने दाखल केली तक्रार

बंगळुरू, दि. २१ वृत्तसंस्था

बंगळुरूमधील एका सॉफ्टवेअर अभियंत्याने त्याच्या पत्नीवर गंभीर आरोप केला आहे. शरीर संबंध ठेवण्यासाठी पत्नी पैशांची मागणी करते, अशी तक्रार पतीने दाखल केली आहे. तर पत्नीनेही पतीविरोधात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली आहे. सदर पतीने बंगळुरूच्या व्यालिकवल पोलीस ठाण्यात पत्नीविरोधात तक्रार दाखल केली असून पत्नीवर मानसिक आणि शारीरिक छळवणुकीचा आरोप केला आहे.

पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, श्रीकांत आणि बिंदुश्री यांचे ऑगस्ट २०२२ मध्ये लग्न झाले होते. लग्न जुळविणाऱ्या संकेतस्थळावरून दोघांची ओळख झाल्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. श्रीकांतने आरोप केला की, लग्न होण्याच्या आधीच सासूने त्याच्याकडे पैसे मागितले होते. श्रीकांतने केलेल्या दाव्यानुसार, त्याने सासूच्या अकाऊंटमध्ये तीन लाख रुपये पाठवले होते. तसेच लग्नात खर्चासाठी ५० हजार रुपयेही दिले होते.

श्रीकांतने तक्रारीत पुढे म्हटले की, लग्नाला दोन वर्ष होऊनही पत्नी शरीर संबंध ठेवण्यास नकार देत होती. जर शरीर संबंध ठेवायचे असतील तर दररोजचे पाच हजार रुपये द्यावे लागतील, असे पत्नीने सांगितल्याचा आरोप पतीने केला आहे.

श्रीकांत जेव्हा जेव्हा पत्नीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करायचा, तेव्हा तेव्हा पत्नी चिठ्ठीत त्याचे नाव लिहून आत्महत्या करण्याची धमकी द्यायची. तसेच माझ्या गुप्तांगाला जखम करून माझी हत्या करण्याचा प्रयत्नही केला, असाही आरोप श्रीकांतने तक्रारीत केला आहे.

श्रीकांतने पुढे म्हटले की, पत्नी आणि तिच्या कुटुंबाने माझ्याकडून प्रति महिना ७५ हजार रुपयांची मागमी केली होती. बिंदुश्री आणि तिच्या आईने घर घेतले होते. या घराचा हप्ता त्यांना माझ्याकडून घेतलेल्या पैशातून भरायचा होता.

श्रीकांतने पत्नीचा आणखी एक विचित्र प्रकार तक्रारीत कथन केला आहे. घरून काम करत असताना जेव्हा श्रीकांत ऑफिसच्या मीटिंगमध्ये असायचा तेव्हा पत्नी जाणूनबुजून वाद घालायची किंवा स्क्रिनसमोर येऊन नृत्य करायची. यामुळे त्याला नोकरी गमवावी लागली. या प्रकाराचा पुरावा असावा म्हणून श्रीकांतने या विचित्र चाळ्याचे व्हिडीओ चित्रीत केले असल्याचे सांगितले.

पत्नीच्या वर्तनाला कंटाळून श्रीकांतने तिला घटस्फोट देण्याचा निर्णय घेतला. मात्र पत्नीने तडजोडीसाठी ४५ लाख रुपयांची मागणी केली.

## माझे भारताशी खूप चांगले संबंध, फक्त एक समस्या आहे - डोनाल्ड ट्रम्प

वॉशिंग्टन, दि. २१ वृत्तसंस्था

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयांची जगभर चर्चा होत आहे. खुद्द अमेरिकेतही काही गटांनी त्यांच्या निर्णयांवर टीका केली असताना दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर काही देश त्यांना समर्थन देत असून काहींनी विरोध दर्शवला आहे. विशेषत: बेकायदा स्थलांतरीतांची घरवापसी आणि इतर देशांवर टेरीफ लागू करण्याची भूमिका. या मुद्द्यावरून सध्या ट्रम्प यांचे भारताशी संबंध काहीसे अडचणीत आले असताना त्यावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी अमेरिकेतील संकेतस्थळ 'ब्रेईटबार्ट न्यूज'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवर सविस्तर भाष्य केलं. यावेळी त्यांनी भारताकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू करण्यात येणाऱ्या टेरिफवर भाष्य केलं.

"माझे भारताशी खूप चांगले संबंध आहेत, पण फक्त एक समस्या आहे. भारत हा जगातला सर्वाधिक टेरिफ दर आकारणाऱ्या देशांपैकी एक देश आहे. मला विश्वास आहे की ते कदाचित आगामी काळात त्यांचे टेरिफ दर कमी करण्याची शक्यता आहे. पण २ एप्रिलपासून अमेरिकेकडून भारतावर तेवढेच दर आकारले जातील, जेवढे दर ते आमच्यावर आकारतात", अशी ठाम भूमिका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावेळी मुलाखतीमध्ये मांडली.



दरम्यान, इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकोनॉमिक कॉरिडॉर अर्थात आयएमईसीबद्दल बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी सकारात्मक भूमिका मांडली. "हा एक अतिशय उत्तम देशांचा समूह आहे. व्यापारविषयक बाबतीत आमच्या हितसंबंधांना धक्का लावणाऱ्या देशांचा सामना या गटाकडून केला जातो. व्यापार क्षेत्रात आमचे खूप खंबीर सहकारी आहेत", असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. मात्र, असं म्हणताना त्यांनी अमेरिकेचे हितसंबंध न जपणाऱ्यांविषयीची भूमिकाही स्पष्ट केली.

"आम्ही आमच्या अशा मित्रांना सोडू शकत नाही जे आम्हाला या बाबतीत वाईट वागणूक देतात. उलट आम्ही आमच्या मित्रांपेक्षा मित्र नसणाऱ्या राष्ट्रांच्या बाबतीत चांगली कामगिरी करत आहोत. जे आमचे मित्र नाहीत ते आमच्याशी काही बाबतीत मित्र असणाऱ्या राष्ट्रांपेक्षा चांगले वागतात. उदाहरणार्थ युरोपियन यूनियन. युरोपियन युनियनकडून आम्हाला व्यापाराच्या बाबतीत वाईट वागणूक मिळते", असं ट्रम्प यांनी नमूद केलं.